MAHMARI 19358/13/1/2000 - TC

प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः
विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष सतरावे / अंक १ / जानेवारी २०१६

## संपादकीय

### नवउद्योग (Start Ups) धोरण

भारताच्या ६९ व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यामध्ये दिल्लीच्या लाल किल्ल्यावरून भाषण करतांना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सध्या चर्चेत असलेल्या नव उद्योजक (Startups) चळवळीला प्रोत्साहित करणारे धोरण लवकरच जाहीर करणार असल्याचे घोषित केले होते. अवघ्या ५ महिन्याच्या अवधीत शनिवार १६ जानेवारी २०१६ ला दिल्लीच्या विज्ञानभवनामध्ये पंतप्रधानांनी या योजनेचा कृती आराखडा (Action Plan) जाहीर केला. अर्थातच याचे समाजाच्या सर्व क्षेत्रातून स्वागत करण्यात आले.

एकंदरीतच उद्योगांच्या निर्मितीला आणि उत्कर्षाला पोषक वातावरण सध्या देशामध्ये नाही हे नाकारता न येणारे वास्तव आहे. याकरताच या सरकाने सुलभ व्यवसायनीतीची घोषणा केली. व्यवसाय नोंदणी, जाचक कामगार विषयक कायदे, असंख्य परवान्यांचे अडथळे (Licences), गुंतागुंतीची करप्रणाली, आणि यातूनच निर्माण होणाऱ्या भ्रष्ट नोकरशाहीमुळे नवीन तर सोडाच, पण अस्तित्वात असलेले उद्योगधंदे चालवणेही गेले कित्येक वर्षे कठीण होऊन बसले आहे. व्यवसाय सुलभ धोरणांच्या बाबतीमध्ये सिंगापूर हे जगातले १ ल्या क्रमांकाचे राष्ट्र आहे. आपला प्रतिस्पर्धी देश चीनचा क्रमांक ५ वा आहे, तर भारताचा प्रमांक १३० वा आहे. सरकार आणि व्यापारामधील भ्रष्टाचाराचा अभ्यास करणाऱ्या Transperency International संस्थेने केलेल्या १७५ देशांच्या पहाणीमध्ये भारत ८५ व्या स्थानावरती आहे.

सर्जनाला गरज असते ती स्वातंत्र्याची, मग ते साहित्य असो किंवा उद्योगधंदे.

कुठल्याही उद्योगधंद्याला ऊर्जितावस्था ही त्याच्या निर्मितीतील 'दर्जा', 'नावीन्य' किंवा परवान्यांवर आधारित 'मक्तेदारी' यामुळेच येऊ शकते. स्वातंत्र्यानंतर साम्यवाद आणि समाजवादाकडे झुकणारी अर्थनीती भारताने स्विकारली. रशियामधील उद्योगधोरणं ही भारताकरता आदर्श राहिली. वसाहतवाद्यांनी आपल्या अस्तित्वाकरता निर्माण केलेली घट्ट नोकरशाही, आणि डाव्या अर्थनीतीला पोषक परवाना केंद्रीत औद्योगिक धोरणांमुळे दर्जा किंवा नावीन्यापेक्षा उद्योगधंद्यांचा विकास हा 'मक्तेदारीवर'च अवलंबून राहिला. यातच सरकारही या क्षेत्रामध्ये उतरल्यामुळे स्पर्धा संपुष्टातच आली. १९९१च्या आधी गाडी विकत घेण्याकरता किंवा साधा दूरध्वनी मिळवण्याकरता भारताच्या नागरिकाला १५-२० वर्षे

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

थांबायला लागत होते. या सगळ्याचा परिणाम म्हणजे १९९१ साली भारत आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा राहिला.

तत्कालीन अर्थमंत्री मनमोहनसिंग यांनी याचवेळी काही क्रांतीकारक आर्थिक धोरणांची घोषणा केली. धोरणांचे उदारीकरण, आणि जागतिकीकरण हा या धोरणाचा गाभा होता. मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असलेले 'परवानाराज' संपुष्टात आणण्याकरता यामुळे पाऊले पडू लागली. या धोरण बदलाला काही सबळ जागतिक कारणेही होती. साम्यवादी अर्थनीतीचा पोथीनिष्ठ स्विकार केलेली चीन आणि रशिया यांची आर्थिक परिस्थिती दिवाळखोरीच्या उंबरठ्यावरच होती. याविरुद्ध लोकशाही आणि भांडवलदारीवर धोरणं आखणारी जपान, सिंगापूर, तैवान, कोरिया ही लहान राष्ट्रे औद्योगिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये प्रचंड प्रगती करत होती. या कुठल्याच राष्ट्रांकडे स्वतःचे नवीन तंत्रज्ञान नव्हते. त्यांचे बहुतेक सर्व उद्योगधंदे हे फक्त नक्कलच करीत होते. पण प्रचंड मेहनत, उदार आर्थिक आणि कामगार धोरण, आणि कमीतकमी सरकारी हस्तक्षेप यामुळे या देशांनी प्रगत देशांमधील उद्योगधंद्यांशी स्पर्धा चालू केली. यातूनच पुढे 'दर्जा' आणि 'नावीन्या'वर भर दिल्यामुळे आज आशिया खंडातील ही सर्व राष्ट्रे अमेरिका आणि युरोपमधील उद्योगधंद्यापुढे आव्हान देऊन उभी आहेत. गेल्या ३० वर्षांत चीनने हाच कित्ता गिरवून उद्योग आणि अर्थकारणामध्ये जगात २ रा क्रमांक मिळवला. आज चीनमधील उद्योग आणि विकासदरामध्ये थोडा जरी फरक पडला तरी त्याचे हादरे अमेरिकेपासून जगातल्या सगळ्याच उद्योगधंदे, व्यापार आणि अर्थकारणाला भोगावे लागत आहेत.

नव उद्योगांच्या संदर्भात या सरकारने जाहीर केलेल्या धोरणांची चर्चा या पार्श्वभूमीवरच करायला लागेल.

वर उल्लेख केलेली आशिया खंडातील चीन किंवा इतर लहान राष्ट्रे काय किंवा अमेरिका आणि युरोपमधील प्रगत देश काय, उद्योगधंद्यांच्या निर्मिती आणि विकासाकरता लागणाऱ्या रस्ते, वीज आणि पाणी या पायाभूत सुविधा त्यांनी आधी पुरवल्या. आजही या संदर्भात वाजतगाजत केलेल्या धोरणांच्या घोषणांपलीकडे प्रत्यक्षात काही विशेष घडतांना दिसत नाही. बहुतेक सर्व सरकारी धोरणं ही चांगलीच असतात. प्रश्न असतो तो अंमलबजावणीचा. ऑस्ट्रेलियामधील नुकत्याच एका कार्यक्रमात रिझर्व बँकेचे गव्हर्नर रघुराम राजन यांनी हेच विचार प्रकट केले.

Implementation remains the major challenge for India's economy and if it can deliver on its promises, the country will be "the place to be" RBI Governer Raghuram Rajan had said.

When asked to nominate the three things that most need to change to make a difference to the Indian economy Rajan said, "Implementation, implementation and implementation."

घोषणा आणि अंमलबजावणीमध्ये दरी निर्माण होण्याची अनेक कारणे आहेत. घोषणे नंतर अत्यंत 'क्लिष्ट' आणि 'गुंतागुंतीचा' असा अंमलबजावणी आराखडा तयार करण्यात येतो. या धोरणाचा प्रत्येक 'उपभोक्ता' हा त्याचा दूर उपयोग करणार आहे हे गृहीत धरूनच हा कृती आराखडा तयार होतो. या बाबतीत आपल्याइतकी 'कल्पक' नोकरशाही जगात कुठेही नसेल. सुलभिकरणापेक्षा

(पृष्ठ क्र. ४० वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष सतरावे / अंक ७ / जानेवारी २०१६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २० वे/अंक ७ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | भावपूर्ण श्रद्धांजली | - | ३ |
| ३) | नोवो हँबुर्गो: एक मध्यमवर्गीय शहर | डॉ. सुधाकर आगरकर | ४ |
| ४) | शास्त्रवेध-२: वायूमंडल | श्री. नरेंद्र गोळे | ७ |
| ५) | नर्मदा परिक्रमा (भाग : २३) | श्री. अरविंद ओक | ११ |
| ६) | ओळख वनस्पतींची-उक्शी | श्री. प्रकाश दुधाळकर | १६ |
| ७) | डिजिटल दुनिया | डॉ. अनघा उदय गोखले | १८ |
| ८) | ग्लोबल वॉर्मिंग - परिणाम व उपाय | सौ. साधना कारंडे जोशी | २१ |
| ९) | दिंड्या पताका वैष्णव नाचती | सहा.प्रा. सुभाष गं. शिंदे | २४ |
| १०) | रोबट - Intelligent Robot | श्री. ह. श्री. परांजपे | ३० |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश ‘विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा’ या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

## भावपूर्ण श्रद्धांजली

विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ सभासद, श्री. श्रीपाद विनायक करंदीकर यांचे गुरुवार, दिनांक २४-१२-२०१५ रोजी अल्पशा आजाराने पहाटे ३ वाजता वयाच्या ९० व्या वर्षी दुःखद निधन झाले.

करंदीकर हे मंडळाच्या सर्वसाधारण सभेचे सभासद होतेच, परंतु १९७६ पासून मंडळाच्या कार्यकारीणीत सभासद म्हणून प्रवेश झाला. मंडळाचे सह-कार्यवाह म्हणून १९७९ ते १९८७, कार्याध्यक्ष म्हणून १९८७ ते १९८८ व १९९० ते १९९९, उपाध्यक्ष म्हणून १९९९ ते २००३ आणि अध्यक्ष म्हणून २००४ ते २००६ पर्यंत असे एकूण ३९ वर्षे या संस्थेत कार्यरत होते.



**श्री. श्रीपाद विनायक करंदीकर**
ज्येष्ठ सभासद

करंदीकरांना सर्व शैक्षणिक विभागातील कर्मचारी ''अण्णा'' म्हणून संबोधित असत. अतिशय शांत, मनमिळावू व सर्वांची आस्थेने चौकशी करणारे, संस्थेच्या व संस्थेच्या शैक्षणिक विभागात असलेल्या कार्यक्रमांना / सभांना जातीने हजर राहून रोखठोक निर्णय घेणे व विचार मांडणे हा त्यांचा स्वभाव होता. त्याचप्रमाणे कोणतेही लेखन असो, पत्र असो, वाचतांना काटेकोरपणे व त्यांच्या मनाचे समाधान जोपर्यंत होत नाही तोपर्यंत ते त्या गोष्टीचा पाठपुरावा करीत असत.

मंडळाचा ६१ वर्षांचा व ७५ वर्षांचा इतिहास संकलित करतांना कै. अचलकुमार टिल्लू व कै. मा. ना. पाटील यांच्या समवेत तासन्तास चर्चा करून एकमताने लेखन पूर्ण करण्यात करंदीकर यांचा सिंहाचा वाटा होता.

त्यांच्या जाण्याने मंडळाने एक उत्कृष्ट मार्गदर्शक गमावला आहे.

शेवटचे जवळ जवळ ९ ते १० महिने ते कार्यालयात येवू शकत नव्हते, पण वारंवार म्हणायचे की मला मंडळात परत जायचे आहे. इतकी त्यांना संस्थेबददल प्रेम व ओढ होती. म्हणून त्यांचे हयात नसणे ही कल्पनाच सहन न होणारी आहे.

त्यांना श्रध्दांजली वाहण्याकरिता मंडळाचे सर्व विभाग प्रमुख व कार्यकारिणीचे सदस्य यांची एकत्रित सभा बुधवार दिनांक ३०.१२.२०१५ रोजी संस्थेच्या विद्यालंकार सभागृहात घेण्यात आली. २ मिनिटे स्तब्ध उभे राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पेजावर, जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंग, विप्रम मनपा विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार, विप्रमच्या तंत्रनिकेतनचे प्राचार्य दिलीपकुमार नायक यांनी करंदीकर यांच्या बाबत मनोगत व्यक्त केले.

करंदीकर कुटुंबावर झालेल्या या दुःखामध्ये विद्या प्रसारक मंडळ परिवार सहभागी आहे.

परमेश्वर करंदीकर यांच्या आत्म्यास चिरशांती देवो ही ईश्वरचरणी नम्र प्रार्थना!

•••

# नोवो हँबुर्गो: एक मध्यमवर्गीय शहर

*ब्राझील या महाकाय देशाच्या दक्षिणेला असलेल्या नोवो हँबुर्गो नावाच्या शहराची माहिती या लेखात दिलेली आहे - संपादक*

नोवो हँबुर्गो (Novo Hamburgo) हे ब्राझील देशाच्या दक्षिण भागात वसलेले एक लहानसे शहर आहे. या शहरात फंडासाव लिबरॅटो (Fundacao Liberato) नावाची तांत्रिक शिक्षण देणारी एक शैक्षणिक संस्था आहे. माध्यमिक शिक्षण पूर्ण करून विद्यार्थी या संस्थेत प्रवेश घेतात. आपल्याकडे जशा पॉलिटेक्निक असतात तशीच ही संस्था आहे. ही संस्था विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला उत्तेजन देण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयांवर स्पर्धा घेते. १९८५ मध्ये त्यांनी या स्पर्धेचे प्रथम आपल्याच संस्थेत आयोजन केले. तेव्हापासून दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात या स्पर्धेचे नियमितपणे आयोजन केले जाते. या स्पर्धेला मोस्ट्राटेक (Mostratec) असे नाव देण्यात आले आहे. या मालिकेतील ३० वी स्पर्धा नोवो हँबुरर्गो शहरात २६ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत पार पडली. सुरूवातीला या स्पर्धेचे स्वरूप स्थानिक होते. ते क्रमाक्रमाने वाढत जाऊन तिला आता आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे. आजच्या घडीला ब्राझील खेरीज सुमारे २० देश या स्पर्धेत सहभागी होतात.



फंडासाव लिबरॅटोची सुबक इमारत

भारताचा समावेश या स्पर्धेत २०१३ साली झाला. त्या वर्षी प्रथमच ठाण्याच्या विद्या प्रसारक मंडळाला या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी निमंत्रण मिळाले. त्यांच्या निमंत्रणावरून ठाणे शहरातील सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेतील विद्यार्थ्यांचा एक प्रकल्प घेऊन आम्ही नोवो हँबुर्गो या शहरात गेलो. या निमित्ताने भारतीय तिरंगा प्रथमच दक्षिण गोलार्धात फडकला. त्या स्पर्धेत भारतीय मुलांची कामगिरी चांगली झाली. त्यांच्या प्रकल्पाजवळ सतत गर्दी असायची. त्यामुळे त्यांनी विशेष उत्तेजनार्थ बक्षीस पटकाविले. दुसऱ्या वर्षी म्हणजे २०१४ मध्ये या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी परत निमंत्रण आले. परंतु त्या निमंत्रणाचा आम्हाला स्वीकार करता आला नाही. याचे कारण आम्ही एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात गुंतलो होतो. अपेक्षेप्रमाणे २०१५ च्या स्पर्धेचे निमंत्रण विद्या प्रसारक मंडळाला मिळाले. ही संधी गमवायची नाही असा निर्धार करूनच आम्ही कामाला लागलो. विद्या प्रसारक मंडळाच्या पॉलिटेक्निक या संस्थेत शिकणाऱ्या सोहम कुलकर्णी या विद्यार्थ्याने विकसित केलेला एक प्रकल्प घेऊन आम्ही स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नोवो हँबुर्गो या शहरात दाखल झालो. आमच्या बरोबर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर हे देखील स्पर्धेला स्वतः हजर राहिले.

खालील चित्रात ब्राझील देशाचा नकाशा दाखविला आहे. त्यात दखविल्यानुसार देशाच्या दक्षिण भागात पोर्टो अलिग्रे नावाचे शहर आहे. ब्राझील देश मुळातच मोठा आहे. या महाकाय देशाच्या दक्षिणेला रिओ ग्रंडे डो सूल नावाचे राज्य आहे. पोर्टो अलिग्रे (Porto Alegre) ही त्या राज्याची




**ब्राझील देशाचा नकाशा**

राजधानी होय. या राजधानीच्या शहराजवळ सुमारे ४० किलोमीटर अंतरावर नोवो हँबुर्गो हे शहर आहे. तेथे पोहोचण्यासाठी बराच लांबचा प्रवास आम्हाला करावा लागला. मुंबईहून प्रथम आम्ही अबू धाबीला गेलो. तेथून सुमारे १५ तासांचा विमान प्रवास करून साव पावलोला पोहोचलो. आमचा शेवटचा टप्पा होता साव पावलो ते पोर्टो अलिग्रे. तेथील विमानतळाहून टॅक्सीने आम्ही आमच्या हॉटेलात पोहोचलो. सगळा प्रवास ३० तासांहून जास्त झाला.




**विमान प्रवासाची दिशा**

वरच्या आकृतीवरून वाचकांच्या लक्षात आले असेलच की या प्रवासात विषुववृत्त पार करून आम्ही दक्षिण गोलार्धात पोहोचलो. उत्तर गोलार्धात ऑक्टोबर महिन्यात हिवाळ्याची चाहूल लागते. दक्षिण गोलार्धात मात्र या महिन्यात हिवाळा संपून उन्हाळा सुरू होतो. नोवो हँबुर्गो हे शहर विषुववृताच्या दक्षिणेला सुमारे ३० अंशावर वसलेले आहे. शहरातील तपमान फारशी थंडी नाही की फारशी गरमी नाही असे होते. साधारणपणे १५ ते २२ सेल्सिअस एवढे तपमान, ढगाळ आकाश आणि मधून मधून येणाऱ्या पावसाच्या सरी यामुळे वातावरण आल्हाददायक असेच होते. मध्यमवर्गीय लोकांचे हे गाव आहे. येथे लहान लहान घरांबरोबरच बहुमजली इमारती देखील दिसतात. शहराच्या काही भागात टुमदार असे बंगले आहेत. या बंगल्यांवर पोर्तुगीज पद्धतीची छाप दिसते. अशा प्रकारचे बंगले आपल्याला गोव्यात पाहायला मिळतात.



**शहरातील बंगले**

जर्मनीमध्ये हँबुर्ग नावाचे शहर आहे. १९३० च्या दशकात त्या परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने येथे आले. आपल्या मूळ गावाशी जवळीक राहावी या उद्देशाने त्यांनी या गावाचे नाव न्यू हँबुर्ग असे ठेवले. पोर्तुगीज भाषेच्या प्रभावामुळे ते नाव नोवो हंबुरर्गो असे झाले. जर्मन लोकांनी येथे चामड्याच्या वस्तू बनविण्याचे कारखाने काढले. आजच्या घडीला मोठ्या प्रमाणावर चामडी वस्तू या शहरातून निर्यात करण्यात येतात. पोर्टो अलिग्रे नावाचे बंदर या शहराच्या जवळच आहे. त्यामुळे वस्तूंची निर्यात करणे सहज शक्य झाले. पोर्टो अलिग्रे आणि नोवो हँबुर्गो या दोन शहरांमधील दळणवळण सुविधा चांगली आहे. या दोन शहरांना जोडणारा एक महामार्ग आहे. त्यामुळे जहाज किंवा विमानाने पोर्टो अलिग्रेला आलेल्या वस्तू

ज्या माणसांकडे विचारांचा भक्कम पाया नाही, त्या माणसांच्या आयुष्याची इमारत उभीच राहू शकत नाही. आणि यदाकदाचित समजा ती उभी राहिलीच तरी ती भक्कम असेलच असं आपण ठामपणे म्हणू शकत नाही.

लगेच नोवो हँबुर्गोला पोहोचवता येतात. दोन शहरादरम्यान दळणवळण जलद आणि सोयीचे व्हावे यासाठी नव्याने मेट्रो रेल्वे बांधण्यात आली आहे. सगळ्या महत्त्वाच्या ठिकाणी स्टेशने बांधून लोकांना कुठेही सहज पोहोचता येईल अशी व्यवस्था केली आहे. मेट्रो रेल्वेचे भाडे एक रियाल सत्तर सेंट एवढे आहे. प्रवासाचे अंतर कितीही असू दे मेट्रोचे भाडे मात्र तेवढेच. एकदा तिकीट मशीनमध्ये घातले की तुम्हाला रेल्वे फलाटावर प्रवेश मिळतो. त्यानंतर इच्छित दिशेने जाणारी गाडी पकडून आपल्याला हवे असेल त्या स्टेशनवर उतरता येते.



**शहरातील मेट्रो रेल्वे**

नोवो हँबुर्गो शहर आणि शहराच्या आजूबाजूला अनेक कारखाने आहेत. या कारखान्यात तयार होण्याऱ्या मालाला बाजारपेठ मिळावी यासाठी इथले उद्योगपती मधून मधून प्रदर्शनं भरवित असतात. असे प्रदर्शन भरवायला सोयीचे व्हावे यासाठी एक मोठे प्रदर्शन केंद्र या शहरात बांधण्यात आले आहे. एक दुमजली मोठी इमारत आणि त्याच्यासमोर मोठी मोकळी जागा असे त्याचे स्वरूप आहे. फेनॅक या नावाने हे प्रदर्शनस्थळ प्रसिद्ध आहे. याच ठिकाणी मोस्ट्राटेक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

शहरात फिरताना दोन गोष्टी प्रामुख्याने लक्षात येतात. एकतर शहरातील स्वच्छता. रस्त्यावर पडलेला कचरा किंवा भरून ओसंडून वाहणारी कचरा कुंडी आम्हाला



**फेनॅक मधील प्रचंड मोठी जागा**

कुठेही दिसली नाही. जागोजागी लोखंडी तारेने बनवलेले खोके ठेवलेले आहेत. या खोक्यात लोक सुका कचरा टाकतात. तो नियमितपणे गोळा करून त्याच्यावर प्रक्रिया केली जाते. ओला कचरा घरोघरी जाऊन गोळा केला जातो. अशा रीतीने संपूर्ण शहर स्वच्छ राखले जाते.



**शहरातील एक सुंदर चर्च**

डोळ्यात भरणारी दुसरी बाब म्हणजे वाहतूक व्यवस्था. शहरात वाहनांची संख्या खूप आहे. तरीही वाहतूक अडली आहे असे होत नाही. प्रत्येक चौकात सिग्नल यंत्रणा उभारलेली आहे. विशेष हे की प्रत्येक चालक या यंत्रणेला मान देतो. अगदी सकाळी रस्त्यावर फारशी वर्दळ नसताना देखील वाहनचालक लाल सिग्नलला थांबलेले मी अनेकदा पाहिले आहे. आमच्या आठवडा भराच्या वास्तव्यात आम्ही एकदाही वाहनांचा हॉर्न वाजलेला ऐकला नाही. त्यामुळे कर्णकर्कश आवाजाचा त्रास होत नाही.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण शीळ रोड, काटई,
ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१२०४

जीवनात, सुखाचे, दु:खाचे, यशाचे, अपयशाचे, आशेचे, निराशेचे असे अनेक प्रसंग येतात. पण विचारांचा भक्कम पाया असणारी माणसं कुठल्याही प्रसंगी ठामपणे उभी राहतात.

# शास्त्रवेध-२: वायूमंडल

*वायूमंडलाविषयी माहिती या लेखात विशद केली आहे - संपादक*

ज्या पृथ्वीवर आपण राहतो त्या पृथ्वीवरच्या भूपृष्ठाचा एक तृतियांश भाग पाण्याने व्यापलेला नसला तरी दोन तृतियांश भागावर पाण्याचे विशाल साठे विपुलतेने विखुरलेले आहेत. महासागर आहेत ते. अनावृत्त भागही वस्तुतः वायूंच्या सुमारे दहा किलोमीटर उंचीच्या थराने आवृत्तच आहे. ह्या वायूंचे वजन, म्हणजेच वातावरणीय हवेचा दाब. जो ७६ सेंटीमीटर उंचीच्या पाऱ्याच्या स्तंभाच्या दाबाइतका किंवा सुमारे १० मीटर पाण्याच्या स्तंभाच्या दाबाइतका दाब असतो. खरे सांगायचे तर पाण्याने आवृत्त असो वा अनावृत्त, भूपृष्ठाच्या सर्वच भागांवर हवेचा हा महासागर विहरत असतो. किंवा असेही म्हणता येईल की, हवेच्या समुद्रतळाशी भूपृष्ठावर आपण संचार करत असतो. पाण्याचे समुद्रही नांदत असतात. पाण्याच्या महासागराचा पृष्ठभाग सरासरी समुद्रपातळीवर स्थिर असतो. उठणाऱ्या लाटा आणि भरती-ओहोटीमुळे निर्माण होणारे उंचीतील बदलच काय ते त्या पातळीस विचलित करत असतात. त्याप्रमाणेच वायूमंडलाचा पृष्ठभागही सरासरी पातळीवर सरसहा सपाटच असतो. त्यावर उठणाऱ्या लाटा, भरती-ओहोटी आणि वारेच काय ते त्या पातळीस विचलित करत असतात. पाणी आणि हवा ह्यांच्या घनता अदमासे १०००:१ ह्या प्रमाणात असतात. त्यामुळे अर्थातच हवा ही पाण्याहून हजारपट हलकी असते आणि म्हणूनच हवेतील विचलनेही पाण्यांतील विचलनांच्या मानाने किमान हजार पट मोठी असतात. पाण्याच्या समुद्रात उसळणाऱ्या ४ मीटर उंचीच्या लाटांना आपण महाकाय लाटा म्हणत असतो. मात्र हवेच्या समुद्रात उसळणाऱ्या लाटा ४ किलोमीटर उंचीच्याही असू शकतात. आपणच काय पण सारे पक्षीगणही सरासरी १० किलोमीटर उंचीच्या हवेच्या समुद्रतळाशीच वावरत असल्याने, ह्या वायूलहरींचा आपल्या जीवनावर सामान्यतः कुठलाच प्रभाव पडत नाही.

ज्याप्रमाणे महासागरातही समुद्रपातळीखाली उंच पर्वत असतात, त्याप्रमाणेच भूपृष्ठावरील हिमालयासारखे खरेखुरे पर्वत, अवनीतलावरील वायुसागरातही डोके वर काढायचा प्रयत्न करत असतात. मात्र तरीही असफलच राहत असतात. त्याचा परिणाम असा होतो की हिमालयाच्या किंवा कुठल्याही इतर उंच हिमाच्छादीत पर्वतशिखरांवर चढू पाहणाऱ्या गिर्यारोहकांना, विरळ हवेचा सामना करावा लागतो. सागरमाथा हे हिमालयाचे सर्वोच्च शिखर ८,८४८ मीटर उंच आहे. म्हणजे सरासरी समुद्रपातळीपासून सुमारे ९ किलोमीटर उंच. एवढ्या उंचीवर गेल्यावर आपल्यावरती शिल्लक राहणारा हवेचा थर १,००० मीटर उंचीचाच काय तो असतो. त्याचा दाब, ७.६ सेंटीमीटर उंचीच्या पाऱ्याच्या स्तंभाच्या दाबाइतका किंवा १ मीटर उंचीच्या पाण्याच्या स्तंभाच्या दाबाइतकाच राहतो. मानवी शरीरास कायमच आवश्यक असणारा प्राणवायू मग कमी पडू लागतो आणि गिर्यारोहण दुरापास्त होऊन जाते. तिथे हवा एवढी विरळ असते की, १९९६ मधील एव्हरेस्ट मोहिमेतील जॉन क्रॅकौर ह्या गिर्यारोहकाच्या पुस्तकाचे नावच 'इन टू थिन एअर' (विरळ हवेत) असे आहे.

मुळात उंच पर्वतशिखरे हिमाच्छादितच का असतात? तर त्या उंचीवर तापमान कमी, म्हणजे अगदी शून्य अंश सेल्शसच्याही खाली असते म्हणून तिथे पडणारा


---

आपल्या भौतिक गरजा मर्यादित ठेवून ध्येयपूर्तीसाठी धडपडणं अयोग्य नाही. पण असं धडपडूनही अपेक्षित यश लाभलं नाही तर नियती देईल ते आनंदानं स्विकारता यायला हवं.

पाऊस एकतर हवेतच गोठून मग तिथे पडतो, किंवा पडल्यावर मग गोठून जात असतो. त्यामुळे हिमनिर्मिती होत असते. तिथे तापमान इतके खाली का असते? हे जाणून घेण्याकरता भूपृष्ठावर तापमान नेहमीसारखे उबदार का असते हे जाणून घ्यावे लागेल. कल्पना करा की तुम्ही तिरुक्कलकुंडरम म्हणजे पक्षीतीर्थमला पर्यटनासाठी गेलेले आहात. हे स्थान एका उघड्याबोडक्या पत्थरी टेकडीवर वसलेले आहे. ऐन दुपारच्या उन्हात त्या टेकडीच्या पायथ्याशी आपण पोहोचतो. मग कुणीतरी सांगते की चपला, बूट इथेच काढून ठेवायचे आहेत. आपण तसे करतो. टेकडी चढू लागतो. हवा जाम तापलेली. ४५ अंश सेल्शसचा उन्हाळा. ऊन मी म्हणत असतं. शरीराची हवेनेच काहिली होत असते. मात्र तळाशी असलेले पत्थर जरा जास्तच तापलेले असल्याचे आपल्या लक्षात येऊ लागते. अगदी सहन होत नाही इतके. त्या दगडांवरही तेच सूर्याचे ऊन पडत असते. मात्र त्या दगडांचे तापमान ५५ अंश सेल्शस तापमानाहूनही अधिक होत जाते. पाय जळू लागतात. असे होण्याचे कारण हे असते की, दगड व माती ह्यांची उष्णता धारण करण्याची क्षमता हवेहून खूपच जास्त असते. सूर्याकडून प्राप्त झालेली ऊर्जा दगड साठवत राहतात. हवेहूनही तप्त होतात. ह्याच कारणामुळे वायूमंडलातील भूगोलाचा पृष्ठभाग सर्वात अधिक तापमानावर राहतो. त्याच्या साहचर्याने निकटची हवाही तापत राहते. मात्र भूपृष्ठावरून जसजसे उंच उंच जावे तसतसे हवेचे तापमान कमी होऊ लागते. भूपृष्ठापासून १० किलोमीटर उंचीच्या वर तर हवाही नसतेच. असते ती केवळ अवकाशीय पोकळी. तिचे तापमान तर शून्य अंश सेल्शसहूनही कमीच असते. सूर्यप्रकाश त्याच पोकळीतून पार होऊन आपल्यापर्यंत पोहोचत असला तरी, पोकळी त्यातील ऊर्जा ठेवून घेत नाही. तिची तशी प्रवृत्तीच नसते.

वात म्हणजे वारा. आवरण म्हणजे वस्त्र. वात हेच जिथे आवरण असते, असे सृष्टीशेजारचे अवकाश म्हणजे

वातावरणाचे थर





वातावरण. वातावरण हे अनेक स्तरांत रचले गेले आहे. हे स्तरही सतत आपापली स्थिती बदलत असतात. हिमालयाचे सर्वोच्च शिखर एव्हरेस्ट, हे समुद्रसपाटीपासून ८,८४८ मीटर उंच आहे. त्यावरही विस्तारणारा पृथ्वीला सगळ्यात लगटून असलेला थर म्हणजे तपांबर. सृष्टीच्या साहचर्याने तापणारे (तप) आकाश (अंबर) म्हणजे तपांबर. ह्या थराची उंची, पृथ्वीच्या धृवीय प्रदेशांवर ७ किलोमीटर पासून, तर विषुववृत्तीय प्रदेशांवर १६ किलोमीटरपर्यंत बदलती असते. ह्या थरात जसजसे उंचावर चढत जावे तसतसे तापमान कमी होत जाते. तापमान कमी होण्याचा सरासरी दर सुमारे ६.५ अंश सेल्शस/किलोमीटर उंची इतका असतो. ह्या थरातच वातावरणाचे ७५% वजन एकवटलेले असते. ह्या थरातच वातावरणातले ९९% पाणी आणि धूळ नांदत असतात. आपण सामान्यपणे ज्याला वातावरण म्हणतो त्याची व्याप्ती ह्या थरातच सीमित असते. हवामानातील बहुतांशी बदल हे ह्या थरातच घडून येत असतात.

पृथ्वीवरील स्थानावर अवलंबून, पर्वताच्या ज्या उंचीवर तापमान शून्य अंश सेल्शसच्याही खाली जाते; अशा ठिकाणांवर हल्ली, आरोग्य-पर्यटन सुरू झालेले आहे. म्हणजे असे की, मानवी शरीर स्वतःला सामान्यतः ३७ अंश सेल्शस तापमानावर सांभाळत असते. त्याहून कमी तापमानावर राहायचे तर शरीरास वातानुकूलनाचा भार

सोसावा लागतो. त्याकरता ऊर्जा लागते. ती ऊर्जा शरीरात साठवलेली चरबी जाळून मिळवली जाते. म्हणजे केवळ शून्याखाली तापमान असलेल्या ठिकाणांवर वर्षातून काही दिवस जरी जाऊन राहिले तरी मनुष्याला स्वतःचे अतिरिक्त वजन सहजच घटवता येते. अशा ठिकाणी जाऊन राहणे अर्थातच खर्चिक असते. सुदैवाने वजन घटवण्याची आवश्यकताही बहुतांशी श्रीमंतांनाच पडत असल्याने हे त्यांना सहज शक्य होते आहे. सागरमाथा तळ शिबिरात (एव्हरेस्ट बेस कँम्पवर) जाऊन परतणारे प्रगत देशातील पर्यटक; दिवसेंदिवस ह्याकरताच तर वाढत आहेत. वास्तविक भारतीयांना हे सोयीचे असूनही, ह्या आरोग्य-पर्यटन क्षेत्रात भारतीय पिछाडीवर आहेत. पुण्यातील काही संस्था हल्ली ह्याकरता पुढाकार घेऊ लागलेल्या आहेत. त्या एवढ्या प्रमाणात गिर्यारोहकांना तिथवर नेऊ लागलेल्या आहेत की त्यांच्या खास आग्रहाखातर, त्यांनीच सागरमाथा तळ शिबिराच्या वाटेवर असलेल्या गोरक्षेप गावात शिवाजी महाराजांचा पुतळाही उभारला आहे[१] .

तपांबराच्या वरचा थर म्हणजे स्थितांबर. स्थितांबराच्या सर्वोच्च थरात ओझोन वायू असतो. सूर्याची उच्चऊर्जा अतिनील किरणे शोषून, तो प्राणवायूच्या अपसामान्य आणि सामान्य अशा दोन प्रकारांत विघटित होतो. म्हणून इथे तापमान घटते असते. त्याखालच्या थरांत हेच दोन्ही प्रकार मग अतिनील किरणे शोषून पुन्हा संघटित होतात. ओझोन निर्माण होतो. ह्या प्रयत्नात ऊर्जाविमोचन होऊन थराचे तापमान वाढते राहते. निसर्गतः आढळून येणारा बहुतांशी ओझोन इथेच निर्माण होत असतो. विविध तापमानांचे थर परस्परांत न मिसळून जाता ह्या भागांत स्थिरपद नांदत असल्यामुळेच ह्या थरास स्थितांबर म्हणतात. ह्या भागात हवेची घनता अत्यंत विरळ असते म्हणून, विमान-उड्डाणांना निम्नतम अवरोध होत असतो. म्हणून विमाने ह्याच थरातून उडवणे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत असते. त्यामुळेच ती जास्तीत जास्त काळ ह्याच थरात राहतील असे उड्डाणांचे नियोजन केले जात असते.




तपांबराच्या सर्वात वरच्या भागात तापमान घटत असते, आणि स्थितांबराच्या खालच्या भागात ओझोन निर्मितीपायी ते वाढते असते. सीमेवरील दरम्यानच्या थरात तापमानाचा घटता कल बदलून वाढता होत जातो. ह्या सीमावर्ती थरास तपस्तब्धी म्हणतात. कारण इथले तापमान कमी अधिक प्रमाणात स्थिरपद राहत असते.

स्थितांबराच्या वरच्या भागात ओझोनचे प्रमाण घटत जाते आणि मध्यांबरात तर ते नगण्यच होते. स्थितांबर आणि मध्यांबराच्या सीमावर्ती भागात हे घडून येते त्या भागास स्थितस्तब्धी म्हणतात. बहुतांशी अतिनील किरणे स्थितस्तब्धीपाशीच अडतात. ती ओलांडून पृथ्वीकडे येत नाहीत.

मध्यांबराच्या वरचा भाग मध्यस्तब्धी म्हणून ओळखला जातो. मध्यांबर संपून उष्मांबर सुरू होण्यादरम्यानचा हा सीमावर्ती भाग असतो.

उष्मांबरात अवकाशातून येऊन पोहोचणारी अतिनील किरणे एवढी शक्तीशाली असतात की, त्या भागात अत्यंत विरलत्वाने आढळून येणाऱ्या अणुरेणूंना ती अतिप्रचंड (हजारो अंश केल्व्हिन) तापमानाप्रत घेऊन

जातात. मात्र इथे हवा एवढी विरळ असते की, सामान्य तापमापक तिथे ठेवल्यास त्यातून प्रारणांद्वारे होणारा ऊर्जा ऱ्हास इतका जास्त असतो की, त्या अणुरेणूंकडून तापमापकास वहनाद्वारे मिळणारी ऊर्जा नगण्य ठरून, तापमापक प्रत्यक्षात शून्य अंश सेल्शसखालील तापमान दर्शवतो.

मध्यांबर आणि उष्मांबर मिळूनच्या संयुक्त थरास दलांबर असेही एक नाव आहे. अणूचे मूलकीकरण होते तेव्हा घन आणि ऋण दले (तुकडे) निर्माण होतात. अतिनील किरणांमुळे सर्वत्र होणाऱ्या मूलकीकरणाचे पर्यवसान तेथील वातावरण घन आणि ऋण दलांनी भरून जाण्यात होते. म्हणून ह्या भागास दलांबर असेही म्हटले जाते.

उष्मांबर आणि दलांबर संपते त्याच्या वरच्या भागात पृथ्वीलगतचे सर्व पदार्थ (वायू) संपुष्टात येत जातात. ह्या संधीप्रदेशास उष्मास्तब्धी म्हणतात. अणुरेणूच न उरल्याने मग दलेही नाहीशी होतात. शिल्लक राहते ते निव्वळ अवकाश. अवकाशाची निर्वात पोकळी. ह्या भागाला बाह्य अवकाश किंवा बाह्यांबर असेही म्हटले जाते.

पृथ्वीपासून सुमारे १६० किलोमीटर उंचीनंतरच्या अधिक उंचीवर, वायूरूप पदार्थांचे अस्तित्वच एवढे विरळ होत जाते की, आवाजाचे वहन करू शकणाऱ्या ध्वनीलहरी निर्माणच होऊ शकत नाहीत. अवकाश निःशब्द होत जाते. बाह्यांबर तर त्यामुळे प्रायः नादविहीनच असते.

बाह्य अवकाशातून सरासरीने वर्षाला ४० टन उल्का पृथ्वीवर येऊन पडत असतात. जर वातावरणच अस्तित्वात नसते, तर दरसाल त्यांच्यापायी चिरडून मरणाऱ्यांची संख्याही आपल्याला मोजावी लागली असती. मात्र वायुमंडलातील कमालीच्या उच्च तापमानातून त्यांना प्रवास करावा लागत असल्याने आणि पृथ्वीशी अधिकाधिक सलगी साधत असता वातावरणाशी होत जाणाऱ्यात वाढत्या घर्षणाने त्यांची वाफ होऊन जाते. अर्थातच वायुमंडल हे आपले सुरक्षा कवचच आहे. अतिनील किरणांपासूनचे, उल्कांपासूनचे, आणि विश्वकिरणांपासूनचेही. कारण विश्वकिरणांतील प्रचंड ऊर्जा वायुमंडलात शोषली जाऊन अवनीतलावर पोहोचता पोहोचता ती सुसह्य होऊन जात असतात.

असे आहे अवनीतलावरील सुरस वायुमंडल! आपले अद्भूत सुरक्षा कवच.

[१] **संदर्भ**: सागरमाथा, डॉ. राम तपस्वी, मूल्य रु. ५००/, प्रकाशनकाल अदमासे २००५.

**- नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# नर्मदा परिक्रमा

**भाग : २३**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस ६३ वा. नीलकण्ठेश्वर ते रेवागाँव (चमेटी-मण्डी-खडगाँव-बाबरी-कोलार-जाजना-मट्टा सकाळी ७.१५ ते संध्या. ५.०० नेहलाई-रेवा)**

सकाळी चहासाठी रामनिवासकडे भेट दिली. तो आमची वाट पाहतच होता. रात्रभर अंगणात जी शेकोटी वजा चूल पेटती होती त्यावर चहाचे आधण चढले. गूळ घालून खमंग चहा तयार केला. आपण खास पाहुण्यांसाठी जसा ठेवणीतला टी सेट काढतो त्याचप्रमाणे त्याने एका खोक्यातून खास कपबशा काढल्या. आम्ही अंगणातच आनंदाने चहापान आटोपले.

आता त्याची नशा उतरलेली होती. आम्हाला भोजन व चहा दिल्याचा आनंद त्याच्या नेत्रांमधून आणि देहबोलीतून प्रकट होत होता. काल केलेली सर्व खिचडी त्याने आम्हाला आणून दिली होती. एक पिशवी परत जी आम्ही केली, त्यातली खिचडी त्याच्या आईने खाऊन स्वतःची भूक भागवली हे आम्हाला आता कळले. स्वतः उपाशी राहून परिक्रमावासीयाना भोजन देणारी त्याची माता धन्य धन्य आहे.

मुलगा दारुड्या आहे. संसार आहे परंतु नशाबाजीमुळे मुलाबाळांकडे पूर्ण दुर्लक्ष होते. ही व्यथा त्याच्या वडिलांनी आम्हांसमोर मांडली.

त्यांच्यासमोरच मी रामनिवासला 'मद्यपाश' हा एक विकार आहे आणि ईश्वराचे सहाय्य आणि स्वतःचा संकल्प या बळावर दारूपासून कसे दूर राहता येते ते समजावले.

मद्यपाश हा इतर विकारांप्रमाणे एक विकार आहे. हे WHO (वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन) म्हणजे जागतिक आरोग्य संघाने मान्य केले आहे. हा विकार प्राणघातक आहे. अकाली मृत्यू किंवा वेड लागणे अशी परिणती या रोगामुळे होते.

इतर विकार शारीरिक किंवा मानसिक यापैकी एकाच प्रकारात मोडतात. परंतु मद्यपाश हा रोग मानसिक ओढ आणि शारीरिक ॲलर्जी असा दोघांना ग्रासणारा आहे.

मानसिक ओढीने रूग्ण एक पेग प्यायला जातो आणि नंतर त्याची शारीरिक ॲलर्जी जागी होते आणि न शमणारी दारूची तहान त्याला अधिकाधिक दारू प्यायला लावते. हे सांगून मी त्याला सांगितले की शेवटी घेतलेल्या घोटाने घोटाळा होत नाही; तर अगदी पहिला घोटच घातक असतो की जो घेतल्यावर ही विचित्र ॲलर्जी जागी होते. पहिला घोट दूर ठेवला तर हे सुरूच होत नाही.

आणि हा पहिला दारूचा घोट दूर ठेवायचा तर सकाळी उठल्याबरोबर देवाला प्रार्थना करायची की 'देवा मला त्या पहिल्या घातक घोटापासून दूर राहायला मदत कर.' हा संकल्प रोज सकाळी उठल्याबरोबर करायचा आणि दिवसभर पाळायचा. फक्त चोवीस तासांसाठी! 'मला आज सांभाळ' इतका हा सोपा कार्यक्रम आहे. (याला ए. ए. संस्थेने 'वन् डे ॲट अ टाइम' असे सार्थ नाव दिले आहे.)

त्याला समजावून सांगितले की तू चांगला माणूस आहेस. फक्त या रोगाला बळी पडलेला आहेस. पण यातून बाहेर येऊन अतिशय सुंदर आयुष्य तू जगू शकतोस.

मैय्याची मदत घे. ती जरूर तुला मद्यपाशातून मुक्त करेल.

रामनिवास आम्हाला सोडायला अर्धा-एक किलोमीटर बरोबर आला. सोबत त्याचा पांढरा देखणा कुत्राही होता. निरोप घेतला आणि आम्ही वाटेला लागलो. कालपर्यंत आम्ही प्रवास केला तो मैय्याला समांतर अशा पण उंचावरून जाणाऱ्या आणि बैलगाडी जाईल इतक्या रूंद परंतु कच्च्या रस्त्याने. आता मात्र दिशा बदलली आणि गहू हरबरा यांच्या पिकातून जाणारी पायवाट आम्हाला मण्डी गावाकडे घेऊन चालली होती.

पिकावर इतके दव होते की आवरून धरलेली लुंगी चिंब ओली झाली. दवामुळे पायवाटेवरची मातीसुद्धा इतकी ओली झाली होती की बुटाचे सोल चिखलमातीने भरून वजनदार झाले होते. वाटेत लागणारी शेती इतकी विस्तीर्ण होती की नजर पोहोचेल तेथपर्यंत गहूच गहू, हरभराच हरभरा असे विलक्षण दृश्य होते. अधेमधे एका बाजूला झाडी म्हणजे सागाचे अरण्य लागत होते.

मण्डी गावातून उतरलो ते थेट कौशल्या नदीच्या किनारी. पाणीच पाणी चहूकडे! पायामधल्या लहान मोठ्या बेटांमुळे पाणी विविध अंगाने साठले होते. प्रवाहाची ओढ मधल्या धारेत मात्र चांगलीच जोरदार होती. पात्र चांगलेच रूंद होते आणि नदी कुठून ओलांडावी ते उमजेना.

'नर्मदे हर' म्हणून हाका मारल्या तर पलीकडल्या तीरावरून एक मुलगा धावत-पळत आमच्याजवळ आला व त्याच्या मार्गदर्शनानुसार आम्ही कौशल्या नदी ओलांडली. अलीकडे बूट काढणे, पलीकडे कोरडी जागा पाहून पाय कोरडे करून मोजे बूट घालणे हे सोपस्कार पार पाडून पुढे निघालो.

या भागात ओलांडणे या अर्थी 'कूदना' हा शब्द प्रचलित आहे. नदी कूद जाओ, अस्पताल कूद जाओ, स्कूल कूद जाओ इत्यादी. ही नदी कुदण्यापूर्वी आम्हाला दुबे नावाच्या तरुण कुटुंब प्रमुखाने अगत्याने चहा पाजला होता. कोणताही प्रवाह, उपनदी ओलांडताना परिक्रमावासी उदबत्ती लावून लाक्षणिक पूजा करतात. आम्ही मात्र हे पाळत नव्हतो.

नदी ओलांडून आम्ही खडगाँवला आलो. गंमत म्हणजे मण्डी गावात प्राथमिक शाळा आहे. परंतु माध्यमिक शाळा नाही. हायस्कूल आहे. ते नदीपलीकडील या खडगावला. नदीवर साकव किंवा पूल नाही. त्यामुळे मण्डी येथील माध्यमिक विद्यार्थ्यांना पाण्यातून रोजच नदीपार होणे अनिवार्य झाले आहे. तसे पाणी खूप खोल नाही. परंतु पावसाळ्यात मात्र नावेतून ये-जा करावी लागते.

खडगाँव नंतर पंतप्रधान ग्रामसडक योजनेत तयार झालेला, ५ वर्षे लिखित हमीचा डांबरी रस्ता लागला. बाबरीकडे जाताना वाटेत मूलसिंग नावाचे शेतकरी भेटले. वाटेत खाण्यासाठी त्यांनी टमाटे बरोबर घेतले होते. ते त्यांनी आम्हाला दिले. मुळात त्यांनी एकच टमाटा बरोबर घेतला होता. परंतु काय वाटले कोण जाणे. निघताना आणखी दोन टमाटे त्यांनी पिशवीत टाकले आणि आता आम्ही भेटल्यावर प्रत्येकाला एक एक टमाटा देऊन मोकळे झाले.

वाटेत त्यांचे शेत होते. शेते ओलांडून त्यांच्या शेतात त्यांनी आम्हाला नेले. खुडून ताजे मटार आमच्यासमोर ठेवले. शेतात त्यांची २२ रिंगा खोल विहीर आहे. प्रत्येक रिंग तीन फूट रूंद आहे. म्हणजे ही विहीर सहासष्ट फुटाहून अधिक खोल होती. काही वर्षांपूर्वी ही विहीर खणली तेव्हां प्रत्येक रिंगचा खर्च सतरा रुपये होता. आज हा खर्च प्रतिरिंग २५०० रु. आहे असे ते म्हणाले.

पुढे बाबरी गावापर्यंत आम्ही एकत्र चाललो. बाबरी हे त्यांचे सासर. मेव्हण्याकडून पेरणीसाठी सोयाबीन बियाणे आणण्यासाठी ते बाबरीला आले होते. निरोप घेण्यापूर्वी त्यांनी आम्हा तिघांना ग्लुकोज बिस्किटे दिली. नर्मदे ऽ हर!

---

अखंड यशाने आपल्या जीवनाची केवळ एकच बाजू कळते. दुसरी बाजू कळण्यासाठी अपयशाची जरुरी असते.

सडक संपली आणि कच्चा रस्ता पुन्हा सुरू झाला. बाबरी गावातून उतरलो तो थेट कोलार नावाच्या नदीपाशी. पुढे जाऊन ही उपनदी मैय्याला मिळते. पुन्हा सर्व सोपस्कार करून नदी ओलांडली. मागची कौशल्या नदी काय किंवा आताची कोलार नदी काय, मोटार-सायकली सरावाने इकडून-तिकडे जात-येत असतात. प्रवाहात अनेक जण आपापल्या गाड्या धुवत होते.

गावातील उंचीवरून नदीकिनारी उतरायचे आणि पुन्हा चढून त्या उंचीवर जायचे आणि पुढल्या मार्गाला लागायचे. कोलार नदी ओलांडून आम्ही 'जाजना' गावाकडे चाललो होतो. बोरीची लहानखुरी झाडे अगदी जमिनीपर्यंत तजेलदार टपोऱ्या बोरांनी लगडली होती. जाता जाता दोन-चार, दोन-चार बोरे खाणे सुरू होते.

नेहलाई गावात एका आश्रमात चहा घेतला. रेवा गाव गाठायला साडेचार-पाच वाजतील हे निश्चित झाल्यावर रेवागावीच मुक्काम करावा असे ठरविले. गावात आश्रम आहे ही माहिती मिळाली. परंतु तिकडे न जाता आम्ही गावातच प्रवेश केला. आश्रमाऐवजी एखाद्या घरी आश्रय शोधावा असा विचार होता.

एक-दोन घरे सोडून तिसऱ्या घराच्या अंगणात शिरलो. ही सारी घरे आतमध्ये होती; म्हणजे फाटक रस्त्यावर तर घर पंचवीस-तीस फूट आत!

'नर्मदे हर, आम्ही तीन परिक्रमावासी आहोत, आत येऊ शकतो का?'

अनुज्ञा मिळाल्यावर, बाहेर अंगणात असलेल्या किरकोळ यष्टीच्या कुटुंब प्रमुखास म्हटले,'आश्रम आहे परंतु आम्हा तिघांना आपल्या घरात रात्र वास्तव्याची अनुमती मिळेल का?' असे नम्रतेने, हात जोडून परंतु साशंक मनाने विचारले.

'घर आपका है। आप जरूर यहाँ रूक सकते हो' असे म्हणून अत्यंत आदराने व प्रेमाने त्याने आमचे स्वागत केले. या कुटुंब प्रमुखाचे नाव होते शेरसिंग, S/o श्री. ग्यारसाराम अजयपाल राजपूत (S/o म्हणजे Son of वडिलांचे नाव ...)

**दिवस ६४ वा. रेवागाँव-भांजर कुई-आवली घाट-पथोडा-उँचा खेडा.**

आश्रमात उतरणे हे एक प्रकारे लॉजिंग बोर्डिंगमध्ये जाण्यासारखे असते. जेवण-झोप-पुढे निघून जाणे. या वास्तव्यात गावाशी संपर्क राहात नाही. घरात उतरले की त्या परिवाराशी जवळचे नाते जुळते. गाव, तिथले वातावरण, पिके, गावाची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती समजते. मनमोकळ्या गप्पांमुळे अनेक गोष्टी कळत न कळत समजत जातात. इतर वेळी होणारा वार्तालाप आणि मुक्कामी होणारा वार्तालाप खूपच वेगळा असतो. गावाचे हृदय कळायचे असेल तर आश्रमातला मुक्काम उपयोगी येत नाही.

रात्री शेरसिंगाचा परिवार आणि आमची चांगलीच गट्टी जमली. शेरसिंगाना पाच मुली व एक मुलगा. सर्वात धाकटी दोन वर्षांची तर मोठी अकरावीमध्ये शिकणारी. मुलाचा क्र. ५ वा आणि इयत्ता ५ वीत. अशोक आणि मंगल रोजच शिकवायला जातात. त्यामुळे मुले त्यांच्याभोवती जमून अगदी गुरू शिष्य नाते अनुभवत होती.



रात्री भोजन आणि सकाळची न्याहरी इतका अगत्यशील पाहुणचार घेऊन आम्ही निघालो तेव्हा

सव्वासात वाजले होते. शेरासिंग स्वतः अर्धा किलोमीटर सोडायला बरोबर आले होते. निरोप घेताना त्यांना खूपच भरून आले होते.

सात किलोमीटर अंतर कापल्यावर आवली घाट हे मैय्याकिनारी असलेले तीर्थक्षेत्र लागले. अडीच तासात हे अंतर आम्ही पार केले होते. सोमवती स्नानासाठी पांडवाना बारा वर्षे प्रतीक्षा करून थांबावे लागले होते. त्यामुळे सोमवतीला अनियमिततेचा शाप मिळाल्याची कथा नर्मदा पुराणात आहेसे ऐकले.

आवली घाटावर स्नानाची इच्छा सोडली. कारण पाणी फार थंड होते. बाहेरही थंडी होती. आवली घाटाहून सडकेने पुढे निघालो. तत्पूर्वी काही खाणे झाले होते. त्याचा परिणाम की काय, परंतु डोळ्यांवर झापड यायला लागली. शेती असली तरी मधे मधे सागाचे अरण्य होते. मी थोडासा मागे पडलो होतो. दोन किन्ताने अंथरून एका दाट सावलीत मी आडवा झालो. पाच एक मिनिटांनी उठलो आणि पुन्हा मार्गस्थ झालो. पुढले गाव जवळच होते. दोघेही माझी वाट पाहात एका कट्ट्यावर थांबले होते. ही गोष्ट पावणे अकरा ते अकराच्या दरम्यानची.

पुढे गेल्यावर रस्त्याला छेदून कालव्याला समांतर कच्चा रस्ता लागला. आता उजवीकडे वळून या रस्त्याने जायचे. हा कालवा बहुधा नर्मदेचा असावा. त्यामुळे ओलांडायचा नसावा.

तिथेही मी एका दगडावर थोडावेळ बसलो. मला नजरेच्या टप्प्यात ठेवून अशोक व मंगल पुढे गेले. हा भाग रूक्ष असल्याने दूरवरचा सगळा भाग नजरेच्या टप्प्यात होता. दीड-दोन तास चाललो तरी झाडाची सावली नाही. थंडी असली तरी नकोसे व्हायला लागले. मी दहा एक मिनिटे मागे पडलो होतो.

दक्षिण तटावरील रूक्ष वाटचालीची आठवण झाली आणि माझा उत्साह संपला. सकाळी प्रातर्विधी आटोपला होता. तरी पुन्हा जावे लागले आणि पोट बिघडल्याच्या आशंकेने चिंता वाटायला लागली. वाटचालीत कालव्याजवळ मला सापाची फार मोठी कात दिसली. दोन मीटरपेक्षा अधिक मोठा सर्प असावा.

मी पाय ओढत चाललो होतो. थोडी तापाची कणकण, थोडा अशक्तपणा आणि पोट त्रास देईल का ही आशंका. याला भर म्हणून सावलीविहीन धुळीचा रस्ता आणि वरून मार्तण्ड ताप.

कुणी बाईकवाला समोरून आला आणि मला घेऊन पुढे अशोक थांबला होता तिथे आणून सोडले. अशोकने मला काही औषधे दिली व चालत न येण्याचा सल्ला दिला, जो मी अनिच्छेने मानला आणि वझे दांपत्य मला तेथे सोडून कच्च्या रस्त्याने कालव्याला समांतर निघून गेले.

मी कालव्यावरील पुलावर बसून राहिलो. पथोडा गावातून येणारा रस्ता कालवा पार करून इथून जात होता. त्या पथोडा क्रॉसवर मी थांबलो होतो.

मला अगदी एकाकी वाटायला लागले. बस स्टॅण्डवर जाणारी सडक डावीकडे जाणारी तर कच्चा रस्ता नाकासमोर. येथून बसस्टॅण्ड पाच-सात किलोमीटर दूर होता. एकाददोन बाइकस्वारांनी दिलासा दिला की तेथे जाण्याचे काहीतरी साधन नक्की मिळेल. अर्धा तास होऊन गेला, काहीच चिन्ह नाही. वाट पाहून मी ओले कपडे बाहेर काढले व कट्ट्यावर वाळत घातले. बसून होतो. मनाची अवस्था शोचनीय होती. मला एकट्याला मागे टाकून सहप्रवासी पुढे निघून गेल्याचे दुःख होते की रोष होता? दोघांचेही मिश्रण असावे.

आम्ही बरोबरच परिक्रमा सुरू केली होती. पैकी वझे दांपत्याचा संकल्प दृढ होता व माझ्यापूर्वीचा होता. परिक्रमा सुरू करण्यापूर्वी त्यांनी गाडीची तिकिटे आरक्षित केली होती व त्यानंतर त्यांनी कळविले की सहभागी व्हायचे असेल तर मी माझे तिकीट आरक्षित करावे.

---

हसण्याचं मोल काय आहे हे रडल्यावरच कळतं.

माझा संकल्प दृढ नव्हता. मी विचार केला होता की आयत्या वेळी तिकीट मिळणार नाही. तिकीट काढून ठेवायला हरकत नाही. तिकीट काय केव्हांही रद्द करता येते.

निघताना मी स्वच्छ सांगितले होते की परिक्रमा झेपली नाही किंवा कंटाळा आला तर मी एकटा परत निघून येईन. त्यामुळे मला त्यांनी एकटे सोडले याचे दुःख असले तरी रोष बाळगण्याचा मला अधिकारच नव्हता.

मी बसने प्रवास करून पुढल्याच्या पुढल्या मुक्कामी जाऊन राहावे असा सल्ला मला अशोकने दिला होता.

सव्वा वाजून गेला, दीड वाजून गेला. मला तिथे येऊन अर्धा-पाउण तास होऊन गेला होता. अखेर एक ट्रॅक्टर आला. त्याने मला एक-दीड किलोमीटरवर सोडले. हळूहळू मी चालायला सुरुवात केली. पुढील गावासाठी! ऊन होतेच. एक-दोन बाईक गेल्या. परंतु त्यावर मागे बसायला जागा नव्हती. थोड्या वेळाने एक बाईक येताना दिसली; डबलसीट कोणी नव्हते. हात वर केला तर बाईक न थांबता पुढे निघून गेली. बाईकस्वार मला उद्देशून काहीतरी पुटपुटला; परंतु मला ते ऐकू आले नाही. काही अर्थबोध झाला नाही.

हळूहळू मी गाव गाठले. बसस्टॅण्ड तिथून तीन किलोमीटर दूर होता. गावातून बस-स्टॅण्डवर जायची काही व्यवस्था होईल का अशी चौकशी नाक्यावरच्या चहा टपरीवर केली. एका बाईककडे निर्देश करून एकजण म्हणाला, 'यह सज्जन आपके लिए रुके हुए है।'

मी पाहिले तर गृहस्थ म्हणजे तेच होते की जे काही वेळापूर्वी न थांबता काहीतरी पुटपुटत पुढे निघून आले होते. हे गाव होते पानगुराडिया, जिथे ब्रजकिशोर नामक ७४ वर्षीय या बाईकस्वाराला कुणी भेटणार होते व डबलसीट पुढे जाणार होते.

तो सद्गृहस्थ न भेटल्याने ब्रजकिशोर माझी वाट पाहात थांबले होते. त्यांनी मला आनंदाने नकटीतलाई नाक्यावर आणून सोडले. त्यांचा निरोप घ्यायचा तर म्हणाले, 'चहा पिऊन जा. पण हॉटेलचा चहा तुम्हाला चालतो का? माझे स्नेही समोरच राहतात पाठक नावाचे, त्यांच्याकडे चहासाठी चला.'

मी ब्राह्मण असल्याने कदाचित हॉटेल नको असा विचार त्यांनी केला असावा. मी ब्राह्मण, ते ब्राह्मण आणि त्यांचे स्नेही ब्राह्मण! आम्ही अंगणातच खाटेवर गप्पा मारत बसलो. खरे म्हणजे प्रचंड भूक लागली होती; पण सांगणार कसे?

चहा येईपर्यंत गप्पागप्पांमध्ये, माझे भोजन झाले नाही हे त्यांना कळले. तेही कुठे बाहेर होते म्हणून त्यांचेही भोजन व्हायचे होते.

तीन वाजल्यानंतर वरण-भात भाजी-पोळी असे भोजन मैय्याकृपेने मिळाले. नर्मदे ऽ हर !

दहा किलोमीटर अंतर बसने कापून ऊँचा खेडा गावी पोहोचलो. उतरायची व्यवस्था पाहावी म्हणून चौकशी केली तर स्टॉपजवळच होते हनुमान मंदिर! पाहिले तर मंदिर छोटे; बाजूलाच एक सोडून दिलेली कुटी, जिला दार आहे पण खिडकीला दार नाही. नुसती मोकळी चौकट! हवा मुक्त आत येईल अशी! एकूण काय; ही एक सोडून दिलेली निरर्थक वास्तू होती. एका बाबाचे वास्तव्य काही काळापूर्वी तिथे होते. परंतु यज्ञाच्या नावाखाली बाबाजीने पैसा अडका गोळा केला व नंतर पोबारा केला तो कायमचाच.

संध्याकाळचे ४।। वाजले होते. रस्त्याच्या पलीकडल्या बाजूला एक प्राथमिक शाळा होती. कार्यालयात विनंती केली तर खोली नाही, परंतु शाळेचे पत्र्याचे स्वयंपाकघर आहे. तिथे उतरायची अनुज्ञा मिळाली. सगळीकडे कुलुपे होती, परंतु स्वयंपाकघराचे दार मात्र उघडे होते. आत दोन मोठ्या चुली व सारविलेली जमीन होती. स्वयंपाकघराच्या मागच्या बाजूला लाकडांचा ढीग होता. समोर हातपंप होता. शाळा मोठी होती.

(पृष्ठ क्र. २९ वर)

# ओळख वनस्पतींची
## उक्शी

*मागील अंकापासून प्रत्येक महिन्याच्या अंकात एका वनस्पतीची थोडक्यात माहिती देण्यास सुरुवात केली आहे. उक्शी या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, निसर्गाने सृष्टीचे संतुलन कायम राहण्यासाठी नियम केले आहेत. त्या नुसार विशिष्ट ऋतूमध्येच झाडांना नवीन पालवी फुटते. पक्ष्यांना नवीन पिसे येतात. विशिष्ट पक्ष्यांची गाणी विशिष्ट ऋतूतच ऐकू येतात. केवळ पावसाळ्यात काही बेडकांच्या जाती तसेच किटक दृष्टीस पडतात. तणमोरासारखा पक्षी फक्त ऑगस्ट, सप्टेंबर याच काळात दिसतो. इतर वेळेस मात्र दिसत नाही. तापमानातील चढउतार व बदल यानुसार काही घटनाक्रम लवकर किंवा थोडे उशिरा होतात. घटना मात्र नियमित घडत असतात. विशिष्ट झाडांना विशिष्ट रंगाची फुले येतात. सर्वच झाडांची पाने गर्द हिरव्या रंगाची नसतात. मात्र झाडांसाठी अन्न गोळा करण्याचे महत्त्वाचे काम पानेच करीत असतात. सर्वच फुले सुंदर असतात. पण सर्वच फुलांना सुवास नसतो. काही फुले बिन वासाची तर काही चक्क दुर्गंध पसरविणारी असतात. अर्थात निसर्गाच्या दृष्टीने फक्त गंध महत्त्वाचा. सुगंध व दुर्गंध या मानवी संकल्पना आहेत आणि मित्रांनो, सर्वच फुले सुंदर असली तरी काही फुले मात्र कधी दिसतच नाही आणि काही फुलांना तर चक्क पाकळ्याच नसतात.





पाकळ्याविना फूल? कल्पनाच करवत नाही ना! पण हे खरे आहे. असेच पाकळ्याविना असलेले फूल आहे उक्शीचे. उक्शी एक झुडूप वर्गीय वनस्पती. उंची २ ते ३ मीटर. झुडूप असूनही एखाद्या वृक्षाचा आधार घेऊन वाढण्याची वेलीसारखी सवय. त्यामुळे फांद्या लांबच लांब. याचे खोड पांढुरक्या राखाडी रंगाचे व खडबडीत. मात्र फांद्यांची टोके लवयुक्त व मऊ. याची पाने समोरासमोर व ७ ते १२ से.मी. लांबीची व लंब वर्तुळाकार, देठाशी गोलसर व टोकदार. नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये झाडाला फुले येण्यास सुरुवात होते. पाच पाकळ्यांची ही फुलं चक्क हिरव्या रंगाची असतात. फुलांची ओळख त्यांना असणारे विविध सुंदर रंग यामुळे होत असते. या फुलांना मात्र पाकळ्याच नसतात. फिक्कट हिरव्या रंगाची पाकळ्यांसारखीच दिसणारी ही आहेत, फुलांची बाह्य संरक्षक पटले, या संरक्षक पटलाच्यामध्ये गोलसर पेल्यासारखा भाग व त्या भोवती असणारे दहा पुंकेसर, यांची उंची असमान. प्रत्येक फांदीच्या शेंड्याशी अशा असंख्य फुलांची गर्दी झालेली असते. वाऱ्याच्या झुळकेसोबत ही फुले मस्त डोलत असतात. या फुलांचा फिक्कट हिरवा रंग इतका मोहक असतो की त्याला पाकळ्याच नाहीत याची जाणीवच होत नाही.

उक्शीचे मूळ आहे भारतातच. पश्चिम घाट ते केरळचा मध्य भाग, उत्तर प्रदेश, प. बंगाल तसेच महाराष्ट्रात सर्वत्र आढळते. जवळच्या बांगला देश व श्रीलंका येथे देखील आढळते. उक्शी प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील टिकून राहते. एकदा बीज रुजते व किमान एक वर्ष जगते की नंतर सतत वाढत व फुलांनी बहरत असते. ही फुले वाळली तरी बरेच दिवस झाडावर डोलत असतात. याची फळे लंब गोलाकार व ८ मि.मी. लांब पाच कडा असलेली असतात. फुलांच्या पसाऱ्यात ती चटकन दिसत नाहीत.

जी गोष्ट सहज मिळते तिची किंमत नसते. उक्शी ही अशीच सहज कुठेही उगवणारी व भराभर वाढणारी वनस्पती. ही काय नेहमीचीच म्हणून दुर्लक्षित असणारी वनस्पती. या दुर्लक्षित वनस्पतीमध्ये देखील अनेक औषधी गुण आहेत. पाने सारक असून गॅसेस पासून होणाऱ्या पोटदुखीवर इलाज म्हणून चावून खातात. कोवळ्या फांद्यांचा रस आमांश व अतिसारावर देतात. फुलांचा पोटीस डोकेदुखीसाठी करतात. पोटाचे अनेक विकार, अल्सर इत्यादी मध्येही याचा औषधी म्हणून वापर होतो. आधुनिक तंत्रज्ञानानुसार यावर अधिक संशोधन चालू असून चांगले परिणाम हाती आले आहेत. होमिओपॅथीमध्ये देखील हे एक महत्त्वाचे औषध आहे. पानांपासून अर्क काढून त्यापासून औषध तयार करण्यात येते. याचा औषधी म्हणून वापर करावयाचा असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. अन्यथा नुकसान देखील होऊ शकते. या झाडाचे शास्त्रीय नाव आहे Calycopeteris floribunda. ते व्यवहारात त्याच्या प्रथम नावानेच प्रचलित आहे. भारतात प्रादेशिक भाषांनुसार त्याला विविध नावे आहेत. मात्र उक्शी हे नाव बरेच प्रचलित आहे.

उपरोक्त सर्व उपयोगांसह याचा महत्त्वाचा उपयोग आहे तो पाण्याचे दुर्भीक्ष असलेल्या भागात तहानलेल्या व्यक्तीची तहान काही प्रमाणात भागविण्याचा गुण यांच्यात आहे. यांच्या लांब फांद्यांमध्ये बऱ्याच प्रमाणात पाण्याचा साठा केलेला असतो. याच्या फांद्या कापून उंच धरल्यास त्यातून थेंब थेंब पाणी गळू लागते. जंगलातील बऱ्याचशा वेलींमध्ये अशी पाणी साठवून ठेवण्याची क्षमता आहे. मात्र अशी बहुपयोगी झाडेही दुर्लक्षित असतात. कोणतीही विकास कामे हाती घेतांना प्रथम बळी जातो तो उक्शीचा; मोकळ्या मैदानात आरामात पहुडलेल्या उक्शीला प्रथम लाविले जाते व नंतर इतर झाडांचाही बळी घेतला जातो. एकूण तोडलेल्या झाडांपैकी किती झाडे पुनः लावली जातात हा प्रश्नच आहे. शहरापासून दूर दुसरे घर ही संकल्पना हल्ली वेगाने पसरू पाहते आहे. प्रकल्प साकारतांना सुशोभीत करणाऱ्या नावाखाली बाहेरून आणलेली शोभेची झाडे लावली जातात, ज्यांचा येथील प्राणी, पक्षी, किटक यांना काहीच उपयोग होत नाही. अशा झाडांवर कुठलाही पक्षी घरटे बांधीत नाही व पर्यायाने पर्यावरणाची वाट लागते.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

•••

दिशा
नियमित
वाचा.
आपली
मते जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

महापुरुषांची चरित्रे आणि आत्मचरित्रे ज्यांच्याशी बोलतात त्यांना स्वतंत्र चरित्र प्राप्त होते.

# डिजिटल दुनिया

*डिजिटल दुनियेची कहाणी मनोरंजक आहे. डिजिटल तंत्रज्ञानाविषयी तोंडओळख या लेखात केली आहे - संपादक*

'स्वस्थ बसे तोचि फसे, नवभूमी दावीन मी, या नगराला लागुनिया सुंदर ती दुसरी दुनिया ॥', लहानपणी बालभारतीच्या पुस्तकातील एका कवितेत काबुलीवाल्याने वर्णन केल्याप्रमाणे खरंच ही दुनिया अद्‌भुत आहे. ही दुनिया आभासी आहे. या दुनियेत सारे कसे जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे घडते (अर्थात असे आपल्याला वाटते). ही सुंदर दुसरी दुनिया म्हणजे डिजिटल दुनिया. प्रत्येक दुनियेची आपली म्हणून संस्कृती असते ना अगदी तशीच या दुनियेची देखील आहे, तिलाच 'डिजिटल कल्चर' असे म्हणतात. कोणतीही संस्कृती माणसांना जोडण्यासाठी असते आणि या संस्कृतीत आपण इंटरनेट आणि मोबाईलने एकमेकांशी जोडले गेलो आहोत आणि हेच डिजिटल संस्कृतीचे व्यवच्छेदक लक्षण आहे. या दुनियेची अनुभूती इंटरनेट जोडणीद्वारा घेता येते त्यामुळे तो तुमच्याकडे असेलच, नसेल तर घ्या, कारण हवा, अन्न आणि पाणी इतकीच इंटरनेट जोडणी ही मूलभूत गरज झाली आहे.

या डिजिटल दुनियेची कहाणी मनोरंजक आहे. या दुनियेची बीजे विलियम गिब्सनच्या १९८४ साली प्रकाशित झालेल्या 'न्यूरो सेसर' या वैज्ञानिक कादंबरीत सापडतात. संगणकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानात डिजिटल दुनियेचा उगम सापडत असला तरी ही तिची प्राचीन पाळेमुळे झाली आणि 'इंटरनेट ऑफ थिंग्ज' ही तिची अर्वाचीन शाखा आहे. येथे आपण डिजिटल तंत्रज्ञान म्हणजे काय? डिजिटल तंत्रज्ञानाचे विविध क्षेत्रातील उपयोजन? डिजिटल तंत्रज्ञानाचे फायदे आणि तोटे काय? या सगळ्याचा उहापोह करू. असे एकही क्षेत्र नाही की जिथे डिजिटलने कायाकल्प घडवला नाही. जणू सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपले संपूर्ण आयुष्यच डिजिटल झालंय. पूर्वी फक्त इलेक्ट्रॉनिक वस्तूंसंदर्भात हा शब्द प्रामुख्याने वापरला जायचा. उदा. डिजिटल घड्याळ, डिजिटल वॉशिंग मशीन, डिजिटल कॅमेरा, डिजिटल दूरदर्शन संच (TV) इ. नंतर डिजिटल फिल्म, डिजिटल गाणी, डिजिटल छपाई असे शब्द कानी पडायला लागले आणि आता काय तर डिजिटल व्यवसाय, डिजिटल वित्त, डिजिटल शेती वगैरे वगैरे. थोडक्यात काय तर हे तंत्रज्ञान सर्वव्यापी आहे. या लेखात आपण डिजिटल क्रांतीची तोंडओळख करून घेणार आहोत.

डिजिटल म्हणजे काय हे सोप्या शब्दात सांगायचे झाले तर ही माहिती साठविण्याची अंकीय पद्धत आहे. संगणक फक्त माहिती वाचताना १ आणि ० या अंकांचा वापर करून माहिती वाचतो त्यागोगे आपण संगणकावर आवाज, प्रतिमा आणि प्रचंड महितीचा साठा करून ठेवू शकतो. थोडक्यात संगणक, माहिती तंत्रज्ञान आणि वस्तूंचे इंटरनेट (इंटरनेट ऑफ थिंग्ज) या त्रयींचा एकत्रित वापर म्हणजे डिजिटल तंत्रज्ञान. 'इंटरनेट ऑफ थिंग्ज' म्हणजे निरनिराळ्या वस्तू इंटरनेटच्या सहाय्याने एकत्र जोडल्याने त्या वस्तूं दरम्यान माहितीची जी देवाणघेवाण होईल त्यातून दैनंदिन कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढीस लागेल. याशिवाय प्रगत संगणकीय आज्ञावली, कृत्रिम बुद्धिमत्ता, वायरलेस तंत्रज्ञान, सेन्सर्स, कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स, मल्टीमीडिया इ. सारख्या नेक्स्ट जनरेशन तंत्रज्ञानामुळे डिजिटल तंत्रज्ञानाची कक्षा दिवसेंदिवस रुंदावत चालली आहे.

---

जर कोणी काही चांगले करताना त्याला पाठिंबा देता येत नसेल तर निदान त्याचे पाय तरी ओढू नका...!!!!

आज डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर विविध क्षेत्रात होतो. इलेक्ट्रॉनिक उपकरणात ओनॉलॉग सिस्टमची जागा डिजिटल सिस्टमने घेतली उदा. डिजिटल घड्याळे, संगणकीय आज्ञावलीद्वारा चालणारी स्वयंचलित मशीन्स आली. डिजिटल कॅमेराने तर चित्रपट व्यवसायाचे अर्थकारण बदलले, उदा. बाहुबली हा चित्रपट. डिजिटल छपाईने वर्तमानपत्रे आणि पुस्तकांची दुनिया रंगीबेरंगी झाली. संभाषणाच्या क्षेत्रात तर डिजिटल तंत्रज्ञानाने धमालच उडवून दिली आहे. आईचं पत्र इतिहासजमा झालंय. आजची दुनिया इन्स्टंट मेसेजिंगची, म्हणजे व्हाट्सअॅप सारख्या मेसेंजरची. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आपण जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत असलेल्या व्यक्तिंशी थेट संभाषण करू शकतो. आज सोशल मीडिया म्हणजे फेसबुक, ट्वीटर वगैरेच्या माध्यमातून एकाचवेळी कोट्यवधी लोकांशी संवाद साधू शकतो. ग्रंथालये डिजिटल झाली. त्यामुळे त्यांचे व्यवस्थापन कार्यक्षम झाले, त्यांची माहिती साठविण्याची क्षमता वाढली आणि वाचकांना हवी ती माहिती हवी तेव्हा उपलब्ध करून देता येऊ लागली. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे दुर्मीळ पुस्तकांचे संवर्धन करता येणे शक्य झाले. पण यापुढे जाऊन डिजिटल तंत्रज्ञानाची व्याप्ती कशी वाढत गेली ते आपण पाहू.

'स्मार्ट वर्क' करणाऱ्या 'स्मार्ट पिढी'ची 'स्मार्ट टेक्नॉलॉजी' म्हणजे 'अॅटोमेशन'. ऑटोमेशन हा आजचा परवलीचा शब्द आहे. याचा फायदा निर्मिती क्षेत्रापासून सेवा क्षेत्रापर्यंत आणि घरापासून बाजारापर्यंत सगळ्यांना झाला. कार्यातील अचूकता वाढली आणि गतिमानता आली. या तंत्रज्ञानामुळे मानवी मर्यादांवर मात करता येणे शक्य झाले. उदा. होम 'अॅटोमेशन'. घरातील सर्व यंत्रे त्यांना नेमून दिलेली कामे नित्यनियमाने तर करतीलच पण कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून आपल्याला त्रास होवू नये म्हणून काळजीही घेतील.

तुम्ही 'मास्टर लेव्हल'चा बुद्धिबळाचा खेळ संगणकाबरोबर खेळता ना? किंवा जाहिरातीत पाहिले असेल की स्मार्ट एसी स्वत:च बाहेरील तापमानानुसार खोलीतील तापमानात थंडावा राखतो. थोडक्यात काय तर ही 'स्मार्ट' उपकरणे परिस्थितिनुरूप स्वत:ला 'अॅडजेस्ट' करतात. हे कसे साध्य होते? उत्तर आहे 'कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा कृत्रिम प्रज्ञा'. आपणाला माहितीच आहे की संगणकाला मेंदू नाही. तो मानवी आज्ञावलीनुसार काम करतो. परंतु 'कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा कृत्रिम प्रज्ञा' या तंत्रज्ञानात आपण संगणकाला त्याचे डोके चालविण्यास सक्षम करतो. त्यासाठी समजूतदार आज्ञावलीची निर्मिती केली जाते. अर्थात अशा स्मार्ट आज्ञावली आपल्याला सातत्याने तयार कराव्या लागतील. ही प्रणाली आज संशोधन, उद्योग, वैद्यकीय, शिक्षण, संरक्षण इ. किंबहुना अगदी सर्वच क्षेत्रात वापरली जाते.

'घरचा रोबोट' घरातील सर्व कामे करतो हे आम्हाला नवीन नाही. त्यामुळेच की काय, पूर्वी 'रोबोट' म्हणजे माणसासारखे दिसणारे यंत्र असाच समज होता. परंतु रोबोट म्हणजे इलेक्ट्रॉनिक प्रणालीने युक्त यंत्र जे अनेक भौतिक गोष्टी लिलया करू शकते हे आज सर्वमान्य आहे. रोबोटच्या अनेक जाती देखील आहेत एंड्रॉइड्स, ह्युमनॉइड्स (माणसासारखी बांधणी) वगैरे. इंडस्ट्रियल रोबोटचा वापर आज मोठ्या प्रमाणावर होतो. विशेषत: उत्पादन निर्मिती, जुळणी आणि सामान बांधणी (packing),वाहतूक, पृथ्वी आणि अंतराळ संशोधन, शस्त्रक्रिया, प्रयोगशाळांत आणि सेवा क्षेत्रात होतो.

कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स म्हणजे इलेक्ट्रॉनिक प्रणाली युक्त ग्राहक उत्पादने. पूर्वी इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू वेगवेगळ्या कळायच्या. आता अनेक इलेक्ट्रिक वस्तूंत सेन्सर्स, मायक्रो कंट्रोलरच्या साह्याने करामती केलेल्या असतात.उदा. 'वापरा आणि टाका'वाली विजेरी, दिवाळीतील इलेक्ट्रिकची माळ, इलेक्ट्रॉनिक खेळणी ते अगदी फ्रीज, ओवन, वॉशिंग मशीन पर्यंत सारे काही.

---

ज्याने आयुष्यात पावलोपावली दु:ख भोगलंय तोच नेहमी इतरांना हसवू शकतो,कारण हसण्याची किंमत त्याच्याएवढी कुणाला ठाऊक नसते.. !!

भविष्यात तर आपल्याला चकित करणाऱ्या अनेक अद्भूत गोष्टी यात येतील.

शासनव्यवस्थेची कार्यक्षमता या विषयी काय बोलावे? 'ई-गव्हर्नन्स' हा शब्द जनमानसात रुजू लागला आहे. सरकारी दस्तवेजांचे मोठ्या प्रमाणावर डिजिटायजेशन होत आहे. सरकारी कार्यालयांची संकेतस्थळे योग्य प्रकारे विकसित केली गेली तर अर्ज भरणे, सरकारी कर भरणे ही कामे ऑनलाइन होतील. लोकांचा वेळ वाचेल आणि सरकारी कार्यालये कार्यक्षम होतील. जेव्हा पूर्ण क्षमतेने डिजिटाइज होईल तेव्हा खऱ्या अर्थाने शासकीय कामात पारदर्शकता येईल आणि भ्रष्टाचार कमी होईल. केवळ शासकीय नव्हेच तर बिगर सरकारी कार्यालयेही स्मार्ट बनत आहेत. आज कर्मचाऱ्यांची भरती, मुलाखत, क्षमता चाचणी (competency mapping), त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी त्यांना इ-लर्निंग किंवा इ-ट्रेनिंग, त्यांच्या कार्याचे मूल्यमापन, त्यानुसार वेतन/भत्ते देणे हे सर्व इंटरनेट आणि प्रगत संगणकीय प्रणालीद्वारे चालते.

डिजिटल मार्केटिंग आणि डिजिटल बिझनेस मॅनेजमेंट. उत्पादन आणि सेवा उद्योगात हे तंत्रज्ञान आज सर्रास वापरले जाते. आता व्यवसायात डिजिटल तंत्रज्ञान कसे कार्य करते याचे सोपे उदाहरण म्हणजे, समजा तुम्ही एखादे मासिक वाचत आहात. त्यात पूर्ण पान भरून BMW कारची जाहिरात आहे. तुम्हाला ती माहिती वाचून/गाडीचे चित्र बघून मनोमन इच्छा झाली की गाडीची एक टेस्ट राईड घ्यावी. पण तुम्ही नाही घेऊ शकत. पण तेच एका बटन क्लिकवर तुम्ही त्या कंपनीच्या संकेतस्थळाला भेट देऊन टेस्ट राईड मागू शकता. लगेच तुमच्या शहरातील डिलर तुम्हाला फोन करेल. टेस्टराईडची वेळ सांगेल. हे अगदी काही मिनिटांत घडते. त्यामुळेच त्याला रियल टाइम व्यवसाय प्रणाली म्हणतात. अनेक कंपन्यांनी आपले संकेतस्थळ अथवा ॲप विकसीत करून त्याद्वारे वस्तू अथवा सेवेचे विपणन सुरू केते आहे. संकेतस्थळ अथवा ॲपमध्ये मागणी नोंदवण्याची आणि ऑनलाइन पेमेंट (पैसे हस्तांतरण) करण्याची पण सुविधा असते. आपल्याला या वस्तू अल्पावधीत घरपोच होतात. मोक्याची जागा, मालसाठा, फर्निचर यात प्रचंड गुंतवणूक करायला नको. म्हणूनच वॉल मार्टला ॲमेझॉनशी स्पर्धा करणे जमत नाही. करोडोंचा टॅक्सी व्यवसाय करणाऱ्या उबेर कंपनीची स्वत:च्या मालकीची एकही टॅक्सी नाही. व्यवसायातील विविध कार्ये म्हणजे मनुष्यबळ व्यवस्थापन, वित्त व्यवस्थापन, उत्पादन निर्मिती व्यवस्थापन, यंत्रसामुग्रीची काळजी आणि निगा व्यवस्थापन इ. मध्ये देखील मोठ्या प्रमाणावर 'डिजिटायजेशन' झालेले आहे. यासाठी ERP (एंटरप्राइज रिसोर्स प्लॅनिंग) सिस्टम वापरल्या जातात. या संबधीची माहिति आपण नंतरच्या काही लेखांतून घेणारच आहोत.

मल्टिमिडियाचे दोन प्रकार आहेत. एक प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया. हॉलीवूड चित्रपट किंवा आपल्याकडील पौराणिक कथानक असलेले चित्रपट अथवा मालिका आठवा. त्यात हे असे 'स्पेशल इफेक्ट्स' खूप दिसतील. चित्रपटांत/मालिकांत व्हिज्युअल इफेक्टस्, ॲनिमेशन, त्रिमिती आयाम युक्त दृश्ये आज सर्रास वापरलेली दिसतात. या मल्टिमिडिया तंत्रज्ञानामुळे दृश्य अधिक परिणामकारक रंगवता येतात.

अर्थात डिजिटल तंत्रज्ञानाचे जसे काही फायदे आहेत तश्याच काही मर्यादा देखील आहेत. यातील प्रमुख मर्यादा म्हणजे या तंत्रज्ञानाचे उपयोजन इतक्या भिन्न भिन्न पद्धतीने आणि भिन्न भिन्न क्षेत्रात झालेले आहे की सर्वसामान्य माणसाला गोंधळायला होते. त्यामुळे 'आपल्या क्षेत्रात' या तंत्रज्ञानाचा काय उपयोग होतो एवढाच अभ्यास करावा. दुसरी गोष्ट अशी की 'इंटरनेट ऑफ थिंग्ज'मुळे डिजिटल तंत्रज्ञान प्रचंड गुंतागुंतीचे झाले आहे. त्यामुळे काळाबरोबर चालणारे कुशल तंत्रज्ञ यासाठी आवश्यक

(पृष्ठ क्र.२३ वर)

# ग्लोबल वॉर्मिंग - परिणाम व उपाय

*'ग्लोबल वॉर्मिंग - परिणाम व उपाय' याविषयी लेखकाने आपले मत या लेखात मांडले आहेत - संपादक*

**'हा नाश थांबवा, भूमातेचे तन-मन जळते आहे,
ही वसुंधरा जनसंख्येच्या भाराने रडते आहे।'**

या दोन काव्यपंक्तीतच जागतिक तापमान वाढीमुळे आपल्या वसुंधरेची झालेली अवस्था प्रकट होतेय. मुळात जागतिक तापमानवाढ ही समस्या नसून निसर्गाची एक प्रक्रियाच आहे. पण मानवाच्या 'Need with Greed' ह्या धोरणामुळे या प्रक्रियेने सध्या समस्येचे रूप धारण केले आहे. परिसर आणि निसर्ग यांचे संतुलित नाते म्हणजेच पर्यावरणाची काळजी हे जेव्हा त्याच्या लक्षात येईल तेव्हाच कुठे धरणीचा हा आक्रोश थांबेल. या तापमानवाढीचे मुख्यत्वे पुढील परिणाम निसर्गावर वर्तमानात किंवा भविष्यात आघात करतील.

क्लोरोफ्लोरोकार्बन (C.F.C.) (जो एसी किंवा फ्रिजमध्ये वापरला जातो) व नायट्रोजन, हायड्रोजन ऑक्साईड यांच्या वाढत्या प्रमाणामुळे ओझोनचे प्रमाण (तीव्रता) कमी होवून जीवसृष्टीला धोका निर्माण झाला आहे. समुद्राच्या पातळीमधील धोकादायक वाढ, हिम-नद्यांची पिछेहाट, पावसाची अनियमितता, तसेच त्याची वाढीव तीव्रता हे दृश्य परिणाम प्रामुख्याने दिसून येत आहेत. असे लक्षात येते की, तापमान वाढीमुळे भारताची कोकण किनारपट्टी, बंगालच्या उपसागरालगतचा पश्चिम बंगाल व बांगलादेशचा किनारी भाग या प्रभागांमध्ये समुद्रपातळींमध्ये होणाऱ्या वाढीमुळे किनाऱ्यालगतची जमीन समुद्र गिळंकृत करत आहे. त्यामुळे या विभागातील अनेक गावे, तसेच समुद्रातील काही बेटे पाण्याखाली जाण्याचा धोका आहे. आशियामध्ये असलेल्या प्रचंड लोकसंख्येमुळे अशा पद्धतीने भूभाग समुद्राच्या पोटात गेल्यास त्याचे विपरीत परिणाम अन्य भागांवर जाणवतील. धोकादायक असलेल्या प्रभागांतून मानवी वस्ती सुरक्षिततेसाठी अन्य विभागांमध्ये घुसखोरी करेल. त्यामुळे विविध राष्ट्रांमध्ये मोठे मानवी प्रश्न निर्माण होतील.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. तापमान वाढीमुळे कधी एखाद्या विभागामध्ये मुसळधार पाऊस पडेल आणि त्यानंतरचा मोठा कालावधी कोरडा जाईल. एखाद्या हंगामामध्ये पीक खूप चांगले असेल. तर दुसऱ्या हंगामामध्ये ते कमजोर असेल. अशावेळी प्रचंड लोकसंख्या असलेल्या आपल्या देशामध्ये धान्याची कमतरता जाणवेल. हिवाळ्यात कमी थंडी आणि उन्हाळ्यात ३° ते ५°C तापमान जास्त राहिल्यास पिकांमध्ये रोगाचा प्रादूर्भाव होवून उत्पादनात मोठी घट येईल. पर्यायाने मानवी आरोग्यावरही त्याचा मोठा परिणाम होईल.

ध्रुवाकडील बर्फाच्या वितळण्याने शतकाच्या अखेरीस तेथे बर्फच शिल्लक राहणार नाही अशी भीती व्यक्त होत आहे. तसेच हिमालयातील बर्फाचे प्रमाण केवळ २०% शिल्लक राहून गंगा, यमुना व उपनद्यांना पूर येऊन नंतर पाणी कमी होईल. वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर (W.W.F.) या संस्थेच्या ताज्या अहवालानुसार तापमानवाढीमुळे जगातील सर्वात मोठ्या आणि दहा प्रमुख नद्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. या दहापैकी पाच नद्या या आशिया खंडातील असून त्यात गंगा आणि सिंधू नदीचाही समावेश आहे.

भारताच्या बाबतीत समुद्रपातळीत वाढ होवून किनाऱ्यावरील मुंबई, कलकत्ता, चेन्नई आदी शहरांना धोका निर्माण झाला आहे. Inter Governmental Panal on claiment change (IPCC) या संघटनेच्या अहवालानुसार गेल्या शंभर वर्षांमध्ये जागतिक तापमानात ०.७४° C ची वाढ झाली असून त्यास निसर्गासोबत माणूसही जबाबदार आहे. या तापमान वाढीमुळे समुद्राची पातळी २८ ते ४३ c.m. म्हणजेच १ ते १$^{१}/_{२}$ फूट वाढण्याची शक्यता आहे. या शतकाच्या अखेरपर्यंत प्रदूषित $Co_2$ ७.२ अब्ज टन इतक्या मोठ्या प्रमाणावर वातावरणात सोडला जाईल. तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटा व त्यांची तीव्रता वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. विविध ठिकाणी येणाऱ्या चक्रीवादळांची संख्या व तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. शेतीउत्पन्न, उद्योग व नैसर्गिक ऋतूचक्रात बदल होऊन एकूण अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होईल.

प्रसिद्ध शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग म्हणतात - अण्वस्त्रांच्या शोधांच्या जोडीने दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या तापमानाचा पृथ्वीला सर्वात मोठा धोका आहे. याचे पुरावे हाती येत आहेत. तापमानाच्या वाढीमुळे जंगले (कायमची) नष्ट होतील की काय याची मला भीती वाटते. जंगले नष्ट झाल्यास ॲसिडचा पाऊस पडेल व पृथ्वीची काळजी न घेतल्यास पुढील १ हजार वर्षात मानवजातच नष्ट होईल.

**हा विनाश टाळायचा असेल तर ...**

कार्बनडायऑक्साईडचे उत्सर्जन तब्बल ४०% कमी करणे आवश्यक आहे. मोठ्या प्रामणावर होणाऱ्या संगणकाच्या आणि मोबाइल्सच्या वापरानंतर उत्पन्न होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्स कचऱ्याची मोठी समस्या सध्या निर्माण झाली आहे. त्याच्या विघटनानंतर सर्वाधिक ५१% प्लास्टीक, १३% कॉपर, ३६% अन्य धातू मिळतात. त्यामुळे त्याचा नियंत्रित वापर अत्यंत गरजेचा आहे. या समस्येचे मूळ कारण जगभरातील विशेषतः विकसनशील देशांमध्ये अफाट वेगाने वाढणारी लोकसंख्या आहे. त्यामुळे त्यावर अंकूश ठेवणे गरजेचे आहे.

**प्रदूषणमुक्त पृथ्वीसाठी वैयक्तिक पातळीवर काही निश्चय उपयुक्त ठरतील -**

मी एकत्र कुटुंबपद्धतीत राहीन, जेणेकरून माझ्या गरजा आपोआप कमी होतील. मी प्रवास करताना जास्तीत जास्त सार्वजनिक वाहनांचा वापर करीन, घरातील कचऱ्याचे निर्मूलन मी शक्यतो घरीच करीन, पाणी आवश्यकतेनुसारच व काटकसरीने वापरेन, सार्वजनिक ठिकाणी कचरा न करता विजेचा वापर गरजेपुरताच करीन, लहानसहान जवळच्या कामांकरिता कटाक्षाने सायकलचाच वापर करीन, CNG इंधनाच्या वापरावर भर देईन, प्रदुषणमुक्त सण साजरे करीन, एकट्या माणसासाठी दुचाकी वा चारचाकीचा वापर टाळेन, शक्य झाल्यास रेन वॉटर हारवेस्टींगचा अवलंब करेन, परिसरातील तलावांचे सौंदर्य अबाधीत ठेवीन.

सार्वजनिक क्षेत्रात भारनियमनापेक्षा भारवितरण किती चुकीचे आहे याची दखल घेत रस्त्यावरील प्रखर दिवे, जाहिरातीसाठी होणारा भरमसाठ विद्युत वापर यावर निर्बंध येणे गरजेचे आहे. लाकडी फर्निचरचा कमीत कमी वापर करून प्लास्टिकचा वापर झाल्यास त्याचा पुनर्वापर अधिक सक्षमतेने होणे आवश्यक आहे.

वाहतूक कोंडी : परिणामतः होणाऱ्या प्रदूषणाची समस्या सोडवण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक कार्यक्षम होणे गरजेचे आहे. विजेच्या बल्बऐवजी C.F.L. ट्यूबचा वापर सक्तीचा करावा. A.C. चे तापमान हिवाळ्यात दोन डिग्री कमी व उन्हाळ्यात दोन डिग्री जास्त ठेवल्यास विजेची मोठी बचत होईल. विजेवर चालणारी उपकरणे Stand by मोडवर न ठेवता त्यासाठी on/off

अडचणीत असताना पळून जाणे म्हणजे अजून अडचणीत जाणे.

बटनांचा नियमित वापर व्हावा. ऊर्जा बचत करणाऱ्या साधनांचीच खरेदी व्हावी. Water heater भोवती उष्णता रोखणारे इन्शुलेशन वेष्टन लावावे. तसेच उष्णतेची धग जाणवेल अशा ठिकाणी फ्रीज ठेवू नये. फ्रिजमध्ये जमलेला बर्फ नियमितपणे साफ करावा. कोळसा वा अन्य जळण वापरून ऊर्जा निर्मिती करण्याऐवजी सोलार, हैड्रो वा अणू ऊर्जाद्वारे ऊर्जा निर्मिती केल्यास त्यातून ग्रीन हाऊस गॅसेसचा प्रसार रोखता येईल.

शेती संदर्भात - पाण्याच्या कमतरतेला तोंड देऊ शकणाऱ्या वा पावसामध्ये तग धरू शकणाऱ्या जातींचा शोध घ्यावा लागेल. धान्य साठवण क्षमता वाढवणे व साठवलेले धान्य जास्तीत जास्त कालावधीत चांगल्या स्थितीत कसे राहील यासाठी विविध पद्धती आजमावणे ही कसोटीच ठरावी. विविध हवामान व पर्ज्यन्यमानासाठी मॅक्रो व मायक्रो पद्धतीने जिल्हा पातळीवर अंदाज वर्तविणे ही आजची गरज आहे. जगाला सध्या गोड्या आणि शुद्ध पाण्याची समस्या भेडसावत आहे. त्यासंदर्भात जगभरातील सरकारे व उद्योग संस्थांनी तातडीने प्रयत्न केले पाहिजेत. आम्लपर्जन्याचा दुष्परिणाम होवू नये म्हणून काही ठिकाणी सरोवरांमध्ये चुन्याची निवळी मिसळली जाते. मात्र या तात्पुरत्या उपायावर कायमची उपाययोजना होणे गरजेचे आहे.

जागतिक तापमान वाढीचे हे परिणाम व उपाय जरी बहुश्रूत असले तरी सार्वजनिक व वैयक्तिक पातळीवर हे संकट किती गांभीर्याने घेतले जात आहे यावर पृथ्वीचे भवितव्य अवलंबून आहे. सर्वांनी नागरिकशास्त्राची केवळ मूलभूत तत्त्वे जरी आचरणात आणली तरी शिस्तबद्ध लोकांपेक्षा शिस्तप्रिय समाज निर्माण होऊन पर्यायाने सर्व पृथ्वीवर 'सुराज्य' प्रस्थापित होईल.

याबाबत प्रत्येकाने स्वतःपासून सुधारणेला सुरुवात केली तर आशा नक्कीच पल्लवीत होईल

माना की अंधेरा घना है
पर दिया लगाना कहाँ मना है ?

मानवाने प्रगतीचा कितीही उच्चांक गाठला तरी निसर्गापेक्षा तो श्रेष्ठ ठरूच शकत नाही. कारण तंत्रज्ञानाच्या जोरावर मध्यरात्री जरी माणूस दिवसासारखा उजेड निर्माण करू शकला तरी हे विसरता कामा नये की उन्हासाठी सूर्याचीच गरज असते!

**- साधना कारंडे-जोशी**
डॉ. बेडेकर विद्या मंदिर, ठाणे.

●●●

---

(पृष्ठ क्र.२० वरून **डिजीटल दुनिया**)

आहेत आणि आज त्यांची वानवा आहे किंबहुना आज अनेक कंपन्या 'डिजिटायजेशन'कडे न वळण्याचे ते एक प्रमुख कारण आहे. तिसरी गोष्ट अशी की यात करावी लागणारी प्रचंड गुंतवणूक. अर्थात 'डिजिटायजेशन'साठी जर एखाद्या तज्ज्ञ व्यक्तिची मदत घेतली तर ही गुंतवणूक भविष्यात नक्की फायदा करून देईल. चौथी आणि सर्वात महत्त्वाची अडचण अशी की त्यासाठी व्यक्तिची, व्यवसायाच्या बाबतीत कर्मचाऱ्यांची मानसिकता बदलावी लागेल आणि तेच सर्वात अवघड काम आहे. कारण कोणताही बदल हा माणसाच्या सहजासहजी पचनी पडत नाही. त्यामुळे 'survival of the fittest' या उक्ती प्रमाणे जर आपल्याला टिकून राहायचे असेल तर या नवभूमीत लगेचच या आणि आनंद लुटा. म्हणूनच -

**'तर मग कामे टाकुनी या, नवी बघाया ही दुनिया, या रे या लवकर भरभर सारे या, डिजिटल क्रांतीचा आनंद घ्या, आज दिवस तुमचा समजा ।।'**

**- डॉ. अनघा उदय गोखले**
विप्रमंचे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर
भ्रमणध्वनी : ९८५०८९०३८२

---

# दिंड्या पताका वैष्णव नाचती

*महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाची माहिती देणारा लेख - संपादक*

महाराष्ट्रामध्ये हिंदू धर्मियांची अनेक पवित्र क्षेत्रे व स्थाने आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात हिंदू धर्मांतर्गत विविध पंथ वा संप्रदाय आढळतात. अशाच एका पंथांपैकी वारकरी पंथ हा एक पंथ होय. वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्य म्हणजे या पंथाचे अनुयायी महाराष्ट्राबरोबरच कर्नाटकात देखील आढळतात. उत्तर कर्नाटकातील अनेक भागांमध्ये विठ्ठलाची पूजा-अर्चा करणारे भक्त मोठ्या प्रमाणात आहेत.

वारकरी संप्रदायाचे अनुयायी पंढरपूरच्या विठ्ठलाचे भक्त असून ते विठोबास भगवान विष्णूचा अवतार मानतात. या अर्थाने वारकरी संप्रदाय हा 'वैष्णव' पंथ ठरतो. आपणास ठाऊकच आहे की, हिंदू धर्मात प्राचीन काळापासून 'शैव' व 'वैष्णव' हे दोन पंथ अस्तित्वात आहेत. 'शैव' पंथीय हे प्रामुख्याने महादेवाची (भगवान शिवाची) आराधना करतात, तर 'वैष्णव' भगवान विष्णू व त्याच्या विविध अवतारांची पूजा करतात.

विठ्ठल ही महाराष्ट्रातील अतिशय लोकप्रिय देवता होय असे म्हणणे वावगे ठरणार नाही. दरवर्षी लाखो वारकरी पंढरपूरस्थित विठोबाच्या मंदिरास भेट देत असतात. वारकरी पंथीयांच्या दृष्टीने एकादशी हा फार महत्त्वाचा दिवस आहे. साधारणपणे प्रत्येक एकादशीला वारकरी न चुकता उपवास करतात. वारकरी पंथियांच्या दृष्टीने आषाढी एकादशी व कार्तिकी एकादशी हे फार महत्त्वाचे सण आहेत. आषाढी व कार्तिकी एकादशीस लाखो वारकरी भक्तीभावाने पंढरपूरास येत असतात. आषाढी एकादशी हा तर महाराष्ट्र राज्याचा अधिकृत व सर्वात महत्त्वाचा सण होय असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. कारण या दिवशी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री पंढरपुरच्या मंदिरांत जाऊन विठोबा-रुक्मिणीचे सपत्नीक दर्शन घेतात. वारकरी पंथास खऱ्या अर्थाने पंथाचे वा संप्रदायाचे स्वरूप देण्याचे कार्य संत ज्ञानेश्वरांनी केले असे म्हणणे वावगे ठरणार नाही. तसे पाहता वारकरी पंथ ज्ञानेश्वरांच्या अगोदरपासून म्हणजेच इसवी सनाच्या १३व्या शतकाच्या पूर्वीपासून अस्तित्वात होता. ज्ञानेश्वरांच्या पूर्वीपासून वारकरी पंथीय पंढरपूरास जात असत असे संदर्भ आढळतात. अभ्यासकांच्या मते इसवी सनाच्या निदान ६ व्या शतकापासून जनमानसात विठ्ठल या देवतेची पूजा करण्याचा प्रघात होता. पुंडलिक हा विठ्ठलाचा आद्य भक्त होता असा सर्वसाधारण समज आहे.

असे म्हटले जाते की, पुंडलिक हा आपल्या मातापित्याकडे दुर्लक्ष करून भार्येच्या प्रेमात आंधळा झाला होता. त्याने आपल्या माता-पित्यांकडे दुर्लक्ष केले होते व तो आपला पुत्रधर्म पूर्णतः विसरला होता. मात्र, त्याची कुक्कुटस्वामींसोबत भेट झाल्यावर त्याच्या जीवनात आमूलाग्र बदल घडला. या महान पुरुषाच्या सहवासामुळे पुंडलिकास आपल्या पुत्र-धर्माची जाणीव झाली व तो एक सर्वश्रेष्ठ मातृ-पितृ भक्त बनला. त्यानंतर तो पंढरपूर क्षेत्री आपल्या आई-वडिलांची भक्ती करू लागला. रुक्मिणी श्रीकृष्णावर रुसून दिंडीर वनात गेली असता भगवान श्रीकृष्णाने तिला शोधून काढले व परतत असताना पुंडलिक जेथे आई-वडिलांची सेवा करत होता तेथे आले. त्यावेळी पुंडलिकाने माता-पित्याच्या सेवेत व्यग्र असल्याने भगवान श्रीकृष्णाच्या दिशेने डाव्या हाताने वीट फेकली व भगवान श्रीकृष्ण त्या वीटेवर उभे राहिले. श्रीकृष्णाचे हे वीटेवर उभे असलेले रूप म्हणजेच विठ्ठल

कोणतेही अडथळे नसलेली, साधी वाट कशाचेही नेतृत्व करू शकत नाही.

होय. या विवेचनावरून पुंडलिक हा विठ्ठलाचा आद्य भक्त ठरतो असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यामुळेच वारकरी संप्रदायात विठ्ठल भक्त पुंडलिकास अनन्य साधारण महत्त्व आहे. वारकरी मोठ्या भक्तीभावाने ''बोला पुंडलिक वरदेव हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव, तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय!'' ही घोषणा देताना आढळतात व यावरून देखील पुंडलिकाचे महत्त्व अधोरेखीत होते. त्याचप्रमाणे विठोबाच्या प्रसिद्ध अशा ''युगे अठ्ठावीस वीटेवरी उभा'' या आरतीमध्ये ''पुंडलिका भेटी परब्रह्म आले गा'' ही ओळ येते. चंद्रभागेच्या तीरावर विठोबाचे मंदिर आहे. तर तिच्या मध्यभागी पुंडलिकाचे मंदिर आहे. यावरून देखील वारकरी पंथियांमध्ये पुंडलिकाविषयी किती आदर आहे हे जाणवते.

पंढरपूर व विठोबाचे उल्लेख अगोदर नमूद केल्याप्रमाणे इसवी सनाच्या ६ व्या शतकापासून यायला सुरूवात होते. त्याचप्रमाणे दक्षिणेतील राष्ट्रकूट व चालुक्य या प्रसिद्ध राजघराण्यांच्या काळातदेखील पंढरपुरास भक्त लोक जात असत असे उल्लेख आढळतात. राजकुळातील व्यक्तींपासून ते सामान्य जनांपर्यंत 'विठ्ठल' हे नाव ठेवण्याची परंपरा इसवीसनाच्या निदान ११ व्या शतकापासून होती असे उल्लेख आढळतात. उदाहरणच द्यावयाचे झाले तर इसवीसन १०६२ मध्ये रचल्या गेलेल्या 'दिव्यसुचरित' या तेलुगू ग्रंथात तिरुपतीच्या 'विठ्ठल' हे नाव असलेल्या राजाचा उल्लेख आहे.

मध्ययुगीन काळात जेव्हा महाराष्ट्राच्या बऱ्याचशा भागावर यादवांच्या (राजवंश) राज्याचा अंमल सुरू झाला त्या काळापर्यंत विठ्ठलाची पूजा व भक्ती मोठ्या प्रमाणात सुरू होती व वारकरी पंथाची पाळेमुळे जनमानसात रुजली होती. श्री ज्ञानेश्वरांनी वारकरी पंथास खऱ्या अर्थाने पंथ वा संप्रदायाचे स्वरूप प्राप्त करून दिले असे सर्वजण मानतात. याचे कारण असे की, या पंथास एका अधिकृत ग्रंथाची आवश्यकता होती व संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' च्या रूपात हा ग्रंथ उपलब्ध करून दिला. ज्ञानदेवांनी हा ग्रंथ अतिशय लहान वयात रचला होता. यावरून त्यांच्या प्रखर बुद्धिमत्तेची जाणीव होते.

वारकरी संप्रदायास जनमानसात लोकप्रिय करण्यात अनेक संतांचा वाटा आहे यात दुमत नाही. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत चोखामेळा, संत एकनाथ, संत तुकाराम हे वारकरी संप्रदायातील काही महान संत होत. या संतांप्रमाणेच संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत बहिणाबाई या महिला संतांचीदेखील वारकरी संप्रदायाच्या जडण-घडणीत व प्रसारात अतिशय महत्त्वाची भूमिका होती. वारकरी संप्रदायाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ह्या पंथाची द्वारे पुरुषांइतकीच स्त्रियांनादेखील उघडी होती व आहेत. त्यामुळेच अनेक महिला संतांनी देखील साहित्य निर्मिती करून विठोबास लोकप्रिय करण्याचे काम केलेले आढळते. मध्ययुगीन काळातील ही अतिशय महत्त्वाची बाब म्हणावी लागेल. धार्मिक व सामाजिक बाबतीत महाराष्ट्र त्या काळात देखील पुढारलेला होता ह्याचे हे द्योतक होय. वर नमूद केलेली संत मंडळी समाजातील विविध स्तरांतून तसेच ब्राह्मण, मराठा, कुणबी, अस्पृश्य व महिला (महिलांमध्ये देखील विविध सामाजिक पार्श्वभूमीतून) अशा विविध प्र-वर्गातून आलेली दिसतात.

वारकरी संतांनी विठ्ठल भक्ती लोकप्रिय करत असतानाच सामाजिक समतेचा पुरस्कार देखील केलेला आढळतो. संतांची अजून एक महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी निर्माण केलेली उदंड साहित्य निर्मिती होय. ज्ञानेश्वरांपासून जवळ-जवळ सर्वच संतांनी ग्रंथ, अभंग, ओव्या इत्यादी साहित्य प्रकारात विपुल लिखाण केलेले आढळते.

मराठी साहित्याचा इतिहास अभ्यासताना तज्ज्ञांना संत साहित्याची दखल घ्यावीच लागते. ज्ञानेश्वरांची साहित्य संपदा तर विपुल आहेच. मात्र त्यांचे समकालीन, संत नामदेव यांनी देखील अनेक अभंग व आरत्या रचलेल्या आहेत. नामदेवांनी तर त्या काळात विठ्ठल भक्ती व वारकरी संप्रदायाची पताका उत्तरेत पंजाब प्रांतापर्यंत फडकवलेली होती. संत नामदेवांनी पंजाबात केलेल्या कार्यामुळे तेथील अनेक लोक त्यांच्याकडे आकर्षित झाले होते व अगदी शीख बांधवांमध्ये देखील त्यांचे अभंग लोकप्रिय झाले व

रस्ता नाही असे कधीही होत नाही, रस्ता शोधायला अपयश येते हेच खरे.

आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्या अभंगांचा समावेश 'गुरू ग्रंथसाहेब' या शीख धर्मियांच्या पवित्र ग्रंथात देखील केलेला आहे. नामदेवांनी पंजाबात केलेल्या कार्याची दखल घेऊनच २०१४ सालचे अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन पंजाबमधील 'घुमान' या ठिकाणी भरवण्यात आले. 'घुमान' ही नामदेवांची पंजाबमधील कर्मभूमी होय. या साहित्य सम्मेलनाच्या बाबतीत दुग्ध शर्करा योग म्हणजे या सम्मेलनाचे अध्यक्ष वारकरी संप्रदायातील अतिशय महत्त्वाचे गणले गेलेले संत तुकाराम यांचे चौदावे वंशज व अतिशय प्रसिद्ध असे तत्त्ववेत्ता व संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे हे होते. येथे एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते की डॉ. सदानंद मोरे विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालयात १६ सप्टेंबर २०१५ या रोजी आले होते व त्यांनी संत साहित्य व संतांच्या एकंदरीतच कार्यावर अतिशय उद्‌बोधक व्याख्यान दिले होते व प्रस्तुत लेखाच्या लेखकास त्यावेळेस त्यांचे आशीर्वाद लाभले होते. वारकरी संप्रदायाची काही विशिष्ट वैशिष्ट्ये आढळतात. वारकरी संप्रदायातील व्यक्तीच्या वागण्यातून, बोलण्यातून, वर्तनातून व एकंदरीतच संपूर्ण जीवन शैलीतून या संप्रदायाची वैशिष्ट्ये व वेगळी ओळख दिसते. ह्या मुद्यांना धरूनच ह. भ. प. शं. वा. दांडेकर यांनी नोंदवलेले निरिक्षण रोचक व महत्त्वाचे ठरते. त्यांनी आपल्या 'वारकरी पंथाचा इतिहास' या पुस्तकात असे नमूद केले आहे की, प्रत्येक विठ्ठल भक्त वारकरी असेलच असे नाही. त्यांनी असे म्हणण्याचे कारण म्हणजे वारकरी व अन्य विठ्ठल भक्त यांच्यात एकच समान धागा वा साम्य आढळते व ते म्हणजे हे दोघेही भगवान विष्णूचे रूप मानल्या गेलेल्या विठ्ठलाची भक्ती करतात. मात्र, ही समानता वगळल्यास एक वारकरी व वारकरी संप्रदायाशी संबंधीत नसलेला विठ्ठल भक्त यांच्यात त्यांची जीवनशैली व भक्तीमार्ग यात बऱ्यापैकी वेगवेगळेपण आढळू शकते. याचे कारण म्हणजे वारकरी संप्रदायातील व्यक्तींची काही बाह्य वैशिष्ट्ये व भक्तीतील एक विशिष्ट पद्धती आपणास ठळकपणे दिसतात.

वारकरी संप्रदायातील प्रत्येक व्यक्ती गळ्यात तुळशीमाळा घालतात. त्यांच्या गळ्यात तुळशीमाळा घालणे हे अगत्याचे असते. तुळशी ही विष्णूस प्रिय असल्यामुळे तुळशीची माळा गळ्यात घालणे त्यांच्यासाठी फार महत्त्वाचे ठरते. इतर विठ्ठलभक्त तुळशीमाळा गळ्यात घालतीलच असे नाही किंवा त्यांना तसे बंधनकारक देखील नाही. गळ्यात तुळशीमाळा घालत असल्यामुळे वारकरी संप्रदायास 'माळकरी' संप्रदाय देखील म्हटले जाते.

वारकरी संप्रदायात चार शाखांचा (त्यांना आपण उपसंप्रदाय असे देखील म्हणू शकतो) अंतर्भाव आहे. हे चार उपसंप्रदाय म्हणजे 'चैतन्य', 'स्वरूप', 'आनंद' व 'प्रकाश' हे होत. तसे पाहता वारकरी पंथाच्या या उपशाखा (असे म्हणणे वावगे न ठरावे). बरेच साम्य व अगदी नगण्य फरक आहे. 'चैतन्य' संप्रदायात काहींचा 'रामकृष्ण हरी' हा मंत्र आहे तर काहींचा 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र आहे. 'स्वरूप' संप्रदायाचा ''श्रीराम जयराम जय जय राम'' हा मंत्र असून यातील एक गट कपाळावर तांबडी रेषा लावतो. यास 'रामानुजीय' असे म्हणतात व दुसरा गट पांढरी रेषा लावतो यास 'रामानंदी' म्हणतात. 'आनंद' संप्रदायींचा 'श्रीराम' वा 'राम' (जय हरी) हा मंत्र आहे; तर 'प्रकाश' संप्रदायींचा 'ॐ नमो नारायण' हा मंत्र आहे.

वारकरी संप्रदायाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ते आषाढी, कार्तिकी व इतर एकादशिना नित्यनेमाने पंढरपूरच्या 'वारीस' जात असतात. 'वारी' या शब्दाचे विश्लेषण व अर्थ अनेक विद्वानांनी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र, वारी या शब्दाचा अर्थ 'समुदायाने दरवर्षी एका विशिष्ट दिवशी यात्रेला जाणे' हा होय. वारकरी संप्रदायाचे लोक महाराष्ट्रातील विविध भागांतून समुदायाने टाळ-मृदुंगाच्या नादात भजन करत पंढरपुरास जात असतात.

---

चुका म्हणजेच शिक्षण आणि शिक्षण म्हणजेच जुन्या चुका परत होऊ न देणे. ही एक प्रक्रिया आहे. काही गोष्टी या अनुभवातूनच शिकता येतात. त्यामुळे चुकांतून शिकतच पुढे जायचे असते.

वारकऱ्यांचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ते 'दिंडी'मध्ये वा 'दिंड्यां'सह पंढरपूरच्या वारीस जातात. 'दिंडी' या शब्दाचा अर्थ वेगवेगळ्या विद्वानांनी वेगवेगळा सांगितला आहे. 'दिंडी' या शब्दाचा एक अर्थ 'लहान दरवाजा' असा होतो. तसेच 'दिंडी'चा अर्थ 'पताका' असा देखील लावला जातो. वारकरी पंढरपूरच्या वारीचा प्रवास खांद्यावर पताका घेऊन करत असतात व विठ्ठलभक्तीच्या मार्गातून स्वर्गाचे द्वार भक्तांसाठी उघडावे ही देखील कल्पना वा अपेक्षा असल्याने दिंडी म्हणजे दार वा दरवाजा होय. 'दिंडी' या शब्दाचा दुसरा अर्थ वीणेसारखे छोटे वाद्य होय. वारकरी पंढरपूरास जात असताना त्यांची संख्या खूप मोठी असते. मात्र सर्वांच्या पुढे 'दिंडी' वाजवणारा वारकरी भक्त असतो व त्याच्या मागे इतरजण असतात.

वारकरी संप्रदायाचा प्रसार होण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे संप्रदायाचे 'फड' होत. 'फड' म्हणजे वारकऱ्यांचा समुदाय होय. फडातील सर्व सदस्य साधारणतः एकाच गुरूचे शिष्य असतात व हा गुरू म्हणजे तत्सम फडाचा प्रमुख असतो. असे अनेक फड पंढरपूरासह, महाराष्ट्रभर तसेच महाराष्ट्राच्या बाहेरदेखील आहेत. या फडांवर नित्यनेमाने भजन, प्रवचन व कीर्तने होत असतात. काही प्रसिद्ध फडांपैकी श्री नामदेव महाराजांचा फड, श्री वासकर फड, श्री आजरेकरांचा फड हे होत.

अगोदर नमूद केल्याप्रमाणे वारकरी संप्रदायातील संतांनी विपूल साहित्य निर्मिती केली आहे. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' लिहिली हे सर्वांना ठाऊकच आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ 'भावार्थ दीपिका' या नावाने देखील प्रसिद्ध आहे. ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरी' व्यतिरिक्त 'अमृतानुभव', 'चांगदेव पासष्टी', 'हरिपाठ', 'नमन' व 'अभंग' इत्यादी साहित्य कृतींचीदेखील निर्मिती केली. ज्ञानदेवांप्रमाणेच त्यांचे बंधू श्री निवृत्तीनाथ, सोपानदेव व मुक्ताबाई यांनी देखील प्रामुख्याने अभंग रचलेले आहेत. त्याचबरोबर संत नामदेव, संत जनाबाई, संत एकनाथ, संत तुकाराम इत्यादी संतांनी देखील भक्ती साहित्याची निर्मिती केली आहे. येथे ज्ञानेश्वरांप्रमाणेच संत एकनाथांच्या साहित्याचा ऊहापोह करणे इष्ट ठरेल. कारण नाथांनी देखील प्रचंड प्रमाणात साहित्य निर्मिती केली होती. नाथांनी अभंग, पदे, भारूडे इत्यादी विविध साहित्य प्रकारांत लिखाण केलेले आढळते. एकनाथ महाराजांनी लिहिलेल्या अनेक ग्रंथांपैकी 'भागवत' (यास 'एकनाथी भागवत' असे देखील म्हणतात), 'रुक्मिणी स्वयंवर' व 'भावार्थ रामायण' या ग्रंथांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. 'एकनाथी भागवत' हे वारकऱ्यांना ज्ञानेश्वरीप्रमाणेच अत्यंत पूजनीय आहे. 'ज्ञानेश्वरी' प्रमाणेच एकनाथी भागवताचे देखील वारकरी पंथीय पारायणे करतात. 'ज्ञानेश्वरी' म्हणजे कृष्ण व अर्जुन या गुरू-शिष्यांच्या संवादावरील (भगवद्गीता) मराठीतील ग्रंथ असे म्हणणे वावगे ठरणार नाही. तर 'एकनाथी भागवत' म्हणजे श्री कृष्णाने त्याचा आवडता दुसरा शिष्य उद्धव यास केलेल्या संदेशावर (उपदेशावर) आधारित लिहिलेला ग्रंथ होय. एकनाथांनी आपली साहित्य रचना प्रकर्षाने मराठीत केलेली आहे. यामागे हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान सामान्यजनांना कळावे हीच असल्याचे जाणवते. एकनाथ महाराजांना मराठीविषयी असलेल्या आस्थेची व प्रेमाची प्रचीती त्यांच्या खालील शब्दांतून वा ओळींतून जाणवते.

"संस्कृतवाणी देवे केली । प्राकृत काय चोरापासोनी जाली ?
असोतू या अभिमानभुली । वृथा बोली काय काज ॥
संस्कृत ग्रंथकर्ते ते महाकवी । मा प्राकृती काय उणीवी ?
नवी जुनी म्हणावी । कैसेनि केवी सुवर्णसुमने ॥
कपिलेचे म्हणावे क्षीर ॥ मा इतराचे ते काय नीर ?
आता संस्कृता किंवा प्राकृता । भाषा जाली जे हरिकथा।
ते पावनचि तत्त्वता । सत्य सर्वथा मानली ।"

नाथांच्या भागवतात भक्तिमार्गाचे विवेचन व पुरस्कार केलेला आपणास आढळतो. नाथांनी विठ्ठलभक्ती व वारकरी संप्रदायाचा प्रसार करण्यासाठी भारुडांचा अतिशय खुबीने उपयोग केल्याचे निदर्शनास येते. नाथांनी

एकंदरीतच त्यांच्या लिखाणाद्वारे व भारूड व प्रवचनांतून समाज प्रबोधनाचे देखील कार्य केले आहे. ज्ञानदेव व एकनाथांप्रमाणेच तुकोबांचे देखील भागवत धर्माची पताका फडकत ठेवण्यात फार महत्त्वाची भूमिका आहे. इसवी सनाच्या १७ व्या शतकात तुकाराम महाराजांनी वारकरी संप्रदायाची ज्योत तेवत ठेवण्यात अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली आहे यात काहीच वाद नाही. तुकोबांनी प्रामुख्याने अभंग रचना केलेली जाणवते व त्यांची ही अभंगरूपी साहित्य पुष्पे-तुकारामांची 'अभंग गाथा' म्हणूनच जनसामान्यांमध्ये प्रसिद्ध आहे. तुकोबांच्या लिखाणाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची परखड भाषा हे होय. त्यांनी आपल्या परखड भाषेचे आसूड तत्कालीन सामाजिक वाईट प्रथा, चालिरिती, विषमता, ढोंगीपणा इत्यादी वर ओढलेले दिसतात व त्यातूनच त्यांनी समाज प्रबोधनाचे व वारकरी संप्रदायाचा प्रसार करण्याचे महत कार्य केले.

वारकरी संप्रदायाच्या जडणघडणीत व प्रसारात अगोदर नमूद केल्याप्रमाणे अनेक संत मंडळींनी आपापल्या परीने स्वतःचे योगदान दिलेले आहे. मात्र, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ व संत तुकाराम यांचे या संप्रदायातील स्थान अनन्य साधारण आहे व या चार संतांना वारकरी त्यांच्या संप्रदायाचे संत शिरोमणी मानतात असे म्हणणे वावगे ठरणार नाही. याची प्रचीती तुकाराम महाराज रचित खालील ओळींवरून येते.

''संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ॥
नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ॥
जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ॥
भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ॥''

प्रत्येक संप्रदायाची व पंथाची काही विशिष्ट अशी श्रद्धास्थाने वा तीर्थक्षेत्रे असतात. याच उक्तीप्रमाणे वारकरी पंथियांसाठी देखील काही ठिकाणे फार पवित्र आहेत. या ठिकाणांमध्ये पंढरपूर, नेवासे, आळंदी, देहू, पैठण, मंगळवेढा, त्र्यंबकेश्वर, सासवड, मुक्ताई नगर (पूर्वीचे एदलाबाद), तेर ही ठिकाणे होत.

पंढरपूर तर वारकऱ्यांसाठी परमपवित्र ठिकाण आहे. कारण येथेच त्यांच्या व महाराष्ट्राच्या लाडक्या भगवान विठ्ठलाचे मंदिर आहे व अगोदर नमूद केल्याप्रमाणे गेली शतकानुशतके वारकरी दिंड्या-पताकांसह येथे विठ्ठल दर्शनासाठी वारी करतात. नेवासे हे अहमदनगर जिल्ह्यातील गोदावरी काठचे ठिकाण असून येथेच संत ज्ञानेश्वरांनी वयाच्या पंधराव्या वर्षी 'ज्ञानेश्वरी' सांगितली होती. आळंदी हे गाव पुणे जिल्ह्यात असून येथे ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली होती. त्यामुळे हे स्थान वारकरी पंथियांस फार पूजनीय आहे. देहू हे गावदेखील पुणे जिल्ह्यात असून ही संत शिरोमणी तुकोबांची मातृभूमी आहे. पैठण हे ठिकाण औरंगाबाद जिल्ह्यात गोदावरी काठावर असून याचे प्राचीन नाव प्रतिष्ठान हे होते. पैठण म्हणजे एकनाथ महाराजांची जन्मभूमी व कर्मभूमी होय. मंगळवेढा संत कान्होपात्रेचे गाव होय. नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे निवृत्तीनाथांची तर पुणे जिल्ह्यातील सासवड येथे सोपानदेवांची समाधी आहे. तेर हे ठिकाण उस्मानाबाद जिल्ह्यातील तेरवा नदीच्या काठावर असून ही संत गोरा कुंभारांची कर्मभूमी होय. मुक्ताई नगर (एदलाबाद) येथे मुक्ताबाई विजेचा कडकडाट होऊन गुप्त झाल्या अशी सर्वसाधारण धारणा आहे. वरील सर्व ठिकाणे संत मंडळींच्या जीवनाशी निगडित असल्यामुळे व त्यांच्या पावलांनी पुनीत झालेली असल्यामुळे वारकरी पंथियांना अत्यंत वंदनीय आहेत. वर नमूद केलेल्या स्थानांव्यतिरिक्त वारकऱ्यांचे अनेक मठ महाराष्ट्रात इतर ठिकाणी देखील विखुरलेले आहेत.

वारकरी संप्रदायाचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे या संप्रदायाने गेली जवळ-जवळ हजार वर्षे हिंदू धर्माची पताका महाराष्ट्रात अभिमानाने फडकवीत ठेवण्याचे महान कार्य केले आहे. असे म्हणण्याचे कारण म्हणजे

माणसाची किंमत त्याच्या या तत्त्वांवरूनच ठरते. शॉर्टकट वापरू नका. शॉर्टकटमुळे मूळ रस्ताच हरवण्याची शक्यता असते. आणि असे शॉर्टकट पुढे जाणारा रस्ता अधिक मोठा करणारे ठरतात.

आतापासून हजार वर्षांपूर्वीच भारतावर परकीय आक्रमणे होण्यास सुरुवात झाली व भारतात वेगळा धर्म (इस्लाम) व संस्कृती मानणारे लोक स्थायिक होऊ लागले नव्हे राज्यकर्ते बनू लागले. अशावेळी हिंदू धर्माची ज्योत तेवत ठेवण्याचे कार्य या पंथाच्या संत मंडळींनी व अनुयायांनी केले असे म्हणणे वावगे ठरणार नाही. एवढेच नव्हे, तर वारकरी पंथाने व प्रामुख्याने संतांनी हिंदू धर्माची प्रमुख व उदात्त तत्त्वे मराठी भाषेच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले. त्याचप्रमाणे सामाजिक प्रबोधनाचे, समतेचा प्रसार करण्याचे व मराठी माणसाला आपली वेगळी ओळख व अस्मिता देण्याचे देखील कार्य केले. तसेच त्यांनी 'महाराष्ट्र धर्माची' संकल्पना देखील पुढे लोकप्रिय केली असे म्हणणे वावगे न ठरावे. आजही आपणास वारकरी संप्रदायात समाजातील सर्व प्र-वर्गातील व्यक्ती सामील असल्याचे व प्रत्येकास समानतेची वागणूक दिल्याचे आढळते. ही बाब अतिशय महत्त्वाची आहे यात वाद नाही. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील हजार वर्षांपूर्वीपासूनची परंपरा असलेला अत्यंत लोकप्रिय असा महत्त्वाचा पंथ होय. या पंथाची परंपरा अशीच चालत राहो व वैष्णवांचा मेळा अव्याहतपणे पवित्र पंढरपूर क्षेत्री भरत राहो.

**संदर्भ :**


वारकरी संप्रदाय उदय व विकास : बहिरट भा. पं. व भालेराव प. ज्ञा. भालेराव

महाराष्ट्रातील पंथ : आगरकर सुहास

वारकरी पंथाचा इतिहास : दांडेकर शं. वा.

वारी : स्वरूप आणि परंपरा : डॉ. देखणे रामचंद्र



**सहा.प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**

उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख

जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

भ्रमणध्वनी : 9820328226

Email : subhashinscotland@gmail.com


•••

(पृष्ठ क्र.१५ वरून **नर्मदा परिक्रमा**)

सतरंजी, कांबळे, जाजम वगैरे व्यवस्था? शाळेसमोर रस्त्यापलीकडे कुणी पटेल यांचे घर होते. तिथे विचारावे असा सल्ला मिळाला आणि शाळेचे स्वयंपाकघर मुक्कामासाठी कायम उपलब्ध असते अशीही माहिती मिळाली.

माझी सॅक मी हनुमान मंदिराच्या प्रांगणात ठेवली होती. अशोक व मंगलही मंदिरावरून येताना दिसले. खरे म्हणजे मला चिंता होती की कच्च्या रस्त्याने येणारे ही जोडगोळी गावात कुठे प्रकट होईल हे कसे कळणार? शिक्षक म्हणाले की ते याच रस्त्याने येतील आणि तसेच घडले!

इथे मुक्काम करायचा की नाही? विचार विनिमयानंतर शाळा, मंदिर पाहून समोर पटेल यांच्या घरी गेले. परिक्रमावासी आहोत. आत येऊ शकतो का? अशा विनंतीला होकार मिळाला.

बाजूच्या वाड्यात २२ वर्षीय तरुणाच्या मृत्यूनंतर आठव्या दिवसाची रसोई सुरू होती. मलाही या भोजन प्रसादाचे निमंत्रण होते. परंतु हा काही आनंदोत्सव नव्हता तर या तरुणाने विष खाऊन आत्महत्या केली होती. हा तरुण या पटेलांच्या नातेसंबंधातला होता.

पटेलताई स्वतः उच्च रक्तदाबाने आजारी होत्या. त्यांचे पती अर्धांगवायूने तीन दिवस इस्पितळात होते आणि आज मधुमेहाच्या त्रासामुळे औषधासाठी कुठे दूर गेले होते.

इतके असूनही त्यांनी शाळेत सोय केली. ब्लँकेट, सतरंजी इ. साधने दिली. चहा दिला व रात्री सुग्रास भोजनही दिले!

नर्मदे ऽ हर!!


**– अरविंद ओक**

मानपाडा, डोंबिवली.

भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०


•••

# रोबट - *Intelligent Robot*
# (बुद्धिवंत रोबट - झपाट्याने विकसित होणारे तंत्रज्ञान)

*महायुद्धातील अस्त्रांमध्ये प्रगत तंत्रज्ञानामुळे झपाट्याने प्रगती होत आहे. त्याच्या दुष्परिणामांचा वेध घेणारा लेख - संपादक*

**विष की अमृत, शाप की वरदान - चर्चात्मक लेख**

आईन्स्टाईनला प्रश्न विचारला होता - ''दुसऱ्या महायुद्धातील अणुबॉम्बचे दाहक अनुभव (कोट्यावधींचे मृत्यू,पर्यावरण-रेडियेशन) अनुभवले, तर आता तिसरे पुढचे महायुद्ध कोणत्या अस्त्रांनी होईल ...''

आईन्स्टाईनने उत्तर दिले होते - ''मी तिसऱ्या महायुद्धातील अस्त्राविषयी काहीच सांगू शकत नाही. पण चवथ्या महायुद्धाविषयी खात्रीपूर्वक सांगेन की ते 'दगड धोंड्यांचे' असेल.''

या उत्तराचा अर्थ असा की, पुढचे महायुद्ध होईल त्यात पृथ्वी संपूर्ण जळून गेली असेल, भस्मसात झाली असेल, मानवी संस्कृती नष्ट झाली असेल, त्यावेळेस भांडणे, लढाया, युद्ध करताना माणसाजवळ दगड-धोंड्यांशिवाय दुसरी काहीच आयुधे नसतील!

आईन्स्टाईनच्या या उद्‌गारांचा दाहक अर्थ आता जगाच्या निदर्शनास येत आहे. त्याचे स्वरूप टाईम्स ऑफ इंडिया २० जुलै २०१५ या अग्रलेखात तडफदारपणे मांडले आहे. त्याचा सर्वसाधारण आशय (अग्रलेख वाचावा) ('दिशा'च्या मराठी वाचकांसाठी) खालीलप्रमाणे आहे -

Intelligent Robots (बुद्धिवंत रोबट) - ही रोबट-तंत्रज्ञानाची प्रगती इतकी झपाट्याने, वेगाने होत आहे की; असे हे तंत्रज्ञान दहशतवादी, दुष्ट राष्ट्रे, वेडी माणसे - यांच्या हाती जाईल व त्यांतून 'हिटलर' निर्माण होतील. हा धोका काल्पनिक नाही - जगातील श्रेष्ठ शास्त्रज्ञ व विचारवंत - स्टीफन हॉकिंग, ईलन मस्क, स्टोव्ह वॉझन जॉक यानी रोबटच्या यापुढील वैज्ञानिक संशोधनावर बंदी घालावी अशी विनंती युनो पुढे मांडली आहे. युनोने अशी बंदी Chemical Weapan (रसायनिक अस्त्रे), Biological Weapan (जैविक अस्त्रे) याना घातली आहे. भारताने ह्यासाठी पुढाकार घ्यावा असे टाईम्स सुचवतो.

संदर्भ : Times of India अग्रलेख - Ban Killer Robots दि. ३० जुलै २०१५.

**- ह. श्री. परांजपे**
ग्रंथपाल (निवृत्त), बेडेकर कॉलेज, ठाणे.
बी-२०४, मारुती दर्शन सोसायटी,
आदिशंकराचार्य मार्ग,
मेन गेटसमोर, पवई, मुंबई - ७८.

●●●

**दिशासाठी**

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

दिवाळीची सुट्टी संपली की शिक्षक व विद्यार्थ्यांना वेध लागतात 'स्नेहसंमेलनाचे'. आपल्यातील सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी प्रत्येक मूलं नाचात भाग घेण्यासाठी धडपडत असते. या वर्षी दि. २२/१२/२०१५ रोजी स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या वर्षीचा विषय होता 'आपली आवड'. ' गाणे गा रे पावसा, सूर निरागस हो, छानं किती दिसते फुलपाखरू, सत्यम् शिवम् सुंदरम्, गणपती बाप्पाची पंमपंम छान, हासरा नाचरा श्रावण आला' अशा विविध गाण्यांवर लहान मुलांनी ठेका धरला होता. ह्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणा आपल्या शाळेतील इ.६वीत शिकणारा विद्यार्थी कु. वेदांत जामगांवकर हा होता. त्याने आम्हांला ढोलकी, तबला, संबळ अशी वाद्ये वाजवून दाखविली. या सदाबहार कार्यक्रमाच्या अध्यक्षा होत्या विद्या प्रसारक मंडळाच्या सभासद सौ. अल्पनाताई बापट.

मुलांमधील आत्मविश्वास वाढावा व त्यांना अभ्यासाबरोबर खेळाचे महत्व पटावे यासाठी क्रिडास्पर्धा घेण्यात आल्या.

लहान शिशु : मुलगे - मनोरा रचणे<br>
मुली - बोलिंग

मोठा शिशु : मुलगे - धावत जाऊन मोजे घालणे<br>
मुली - चमचा लिंबू

यात प्राविण्य मिळालेल्या मुलांना स्नेहसंमेलनात बक्षिसे देण्यात आली.

'कला' चिल्ड्रेन ॲकॅडमी तर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत १० मुलांना सुवर्णपदकं व प्रशस्तीपत्रके मिळाली.

या सर्व विद्यार्थ्यांना कु. वेदांत जामगांवकर व सौ. अल्पनाताई बापट ह्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

स्नेहसंमेलनाचा ''अल्पोपाहार'' म्हणून वडापाव व केक मुलांना देण्यात आला.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

दि. २, ३, ४ डिसेंबर २०१५ रोजी शाळेचा वार्षिक क्रीडामहोत्सव पार पडला. यात खो खो, कबड्डी, डॉजबॉल, लंगडी, चमचा लिंबू इ. क्रीडाप्रकार घेण्यात आले.

दि. १५ व १६ डिसेंबर रोजी शाळेचे स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ साजरा झाला.

दोन्ही दिवशींच्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून विद्या प्रसारक मंडळाचे सभासद मा. अनिरुद्ध जोशी सरांना आमंत्रित केले होते.

प्रमुख पाहुणे बालनाट्य दिग्दर्शक राजू तुलालवार आणि सामाजिक कार्यकर्ते व शिक्षक मित्र सुधीर घागस यांना आमंत्रित केलेले होते. ध्येय निश्चित करून त्याप्रमाणे प्रयत्न करण्याचा संदेश प्रमुख पाहुण्यांनी दिला.

सांस्कृतिक कार्यक्रमातून पुढील कार्यक्रमांना निवडण्यात आले.

- **इ. ५ वी ते ७ वी**

सुसंगती सदा घडो - इ. ६वी - प्रथम क्रमांक<br>
बमबम भोले - इ. ५वी - द्वितीय क्रमांक<br>
वंदे मातरम् - इ. ७वी ब - तृतीय क्रमांक<br>
दिल है छोटासा - इ. ५वी } उत्तेजनार्थ<br>
नौराई माझी - इ. ७वी क } उत्तेजनार्थ

---

चिंता केल्याने बिघडलेल्या गोष्टी चांगल्या होत नाहीत.

- **इ. ८ वी ते १० वी**

प्रथम क्रमांक - वंदे मातरम् - इ. १०वी ब

द्वितीय क्रमांक - शंभू स्तुती - इ. ८वी अ

तृतीय क्रमांक - आम्ही ठाकरं ठाकरं - इ. ८वी ड

रंग दे बसंती - इ. ९वी अ<br>वंदे मातरम् - इ. १०वी अ } उत्तेजनार्थ

**अभिनंदन!**

'प्रारंभ' तन्वीहर्बल व फिश लँड प्रस्तुत बालमहोत्सवानिमित्त दि. ९ जानेवारी २०१६ रोजी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यातील 'अथर्वशीर्ष पाठांतर' स्पर्धेमध्ये कु. प्रज्ञा मोरे इ. ७ अ हीस प्रथम क्रमांक प्राप्त झाला. यात बक्षीस स्वरुपात रोख रु. ७०१/-, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन तिला गौरवण्यात आले.

तसेच 'टाकाउतून टिकाऊ' या स्पर्धेत गौरव झगडे इ.७ इ या विद्यार्थ्याला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. त्याला रोख रु. ७०१/-, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

बक्षीस समारंभात शशांक परळकर व प्रतिक्षा भापकर इ.७ब यांना लकी ड्रॉ मधून एक-एक बॅग देण्यात आली.

'क्रिकेट ॲकॅडमी' तर्फे मुंबई आझाद मैदान येथे घेण्यात आलेल्या क्रिकेट मॅचमध्ये इ.७ड मधील हर्ष संतोष भालेकर यास बेस्ट बॅटस्‌मनचे रु.५००/- रोख पारितोषिक प्राप्त झाले.

**रस्ता सुरक्षा अभियान**

रस्ता सुरक्षा सप्ताह अभियाना अंतर्गत झालेल्या वॉलपेंटिंग स्पर्धेत इ.८वी व ९वी चे विद्यार्थी सहभागी झाले.

तसेच समूह नृत्यात शाळेतील इ.६वीतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**विविध रंगी डिसेंबर**

डिसेंबर महिना मुलांच्या विविध कलागुणांचे प्रदर्शन करणाऱ्या अनेक कार्यक्रमांचा असतो. याच महिन्यातील काही उपक्रमांचा वेध या लेखातून घेऊ या -

द्वितीय सत्राला सुरुवात झाली आणि शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमांची निवड, वेशभूषा या चर्चांना सुरुवात झाली.

१९ डिसेंबर शनिवार - विद्यालंकार सभागृहात पूर्व प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन पार पडले; समोरचे पटांगण पालकांनी भरून वाहात होते. लहानग्यांचे कौतुक करायला घरच्या सर्व मंडळींनी हजेरी लावली होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विभाग प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी प्रस्ताविकपर भाषण व शैक्षणिक वर्षाचा अहवाल सादर केला. ज्युनियर व सिनियर के. जी. च्या मुलांनी विविध भाषांतील गाण्यांची निवड करून त्यावर नृत्य बसवले होते. मुलांनी सादर केलेल्या या सादरीकरणाचे पालकांनी भरभरून कौतुक केले.

**२२ डिसेंबर, मंगळवार**

नाताळ व अल्पोपाहार - सर्व जगभरात उत्साहात साजरा होणारा नाताळ आम्ही शाळेत २२ डिसेंबर रोजी साजरा केला. येशू ख्रिस्ताच्या जन्माची गोष्ट सांगणारा देखावा एका वर्गात मांडला गेला होता. या संबंधीचे तक्ते, शुभेच्छा कार्ड, चांदणीचा कंदील या सर्वांनी व्हरांडा सजवला गेला होता. सिनियर के.जी.चा एक मुलगा सांताक्लॉज बनून आला होता. शिक्षकांनी या दिवसाचे महत्त्व व नाताळ का व कसा साजरा करतात? याची माहिती मुलांना दिली. सांताक्लॉजबरोबर मुलांनी नाच केला, व त्याच्याकडून दिला गेलेला केकचा गोड खाऊ खाल्ला.

भूतकाळ आपल्याला आठवणींचा आनंद देतो; भविष्यकाळ आपल्याला स्वप्नांचा आनंद देतो;<br>पण आयुष्याचा आनंद फक्त वर्तमानकाळच देतो....!!!

याच दिवशी मुलांना चमचमीत भेळेचा अल्पोपाहार देण्यात आला.

नाताळच्या शुभेच्छा देऊन आमची चिमुकली आनंदात घरी गेली.

**२३ डिसेंबर, बाजारहाट**

सिनीयर के. जी. च्या मुलांना अभ्यासक्रमात विविध नोटा व नाणी यांचा परिचय तसेच बाजारात जाऊन खरेदी कशी करायची ह्या सर्वाची संकल्पना सांगितली जाते. याचाच एक भाग म्हणून बाजारहाटाचा अनुभव शाळेतच मुलं घेतात. मुलांच्या आवडीच्या वस्तू, खाऊ, खेळणी व काही त्यांनी स्वतः बनवलेल्या वस्तू या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असतात. सिनियर के.जी.तील काही मुले शिक्षकांसोबत दुकानदार होतात तर इतर सर्व गिऱ्हाईक म्हणून आपल्या पालकांसोबत खरेदीला येतात.

या वर्षी २२ डिसेंबरला आमचा बाजार लहान गिऱ्हाईकांनी अगदी गजबजून गेला होता. आमच्या दुकानदारांनी धीटपणे वस्तूंच्या किंमती सांगून आपली भूमिका चोख पार पाडली.

**विशेष उल्लेखनीय**

संस्कृती कलादर्पण या संस्थेद्वारे दरवर्षी शाळांच्या सर्व विभागांसाठी नृत्य, नाटक, निबंधलेखन, वक्तृत्व अशा अनेक स्पर्धांचे आयोजन केले जाते. या वर्षी पूर्व प्राथमिक विभागातून नाटक व नृत्य विभागात आमच्या शाळेचा सहभाग होता. आमच्या सिनियरच्या मुलांनी कोळीनृत्य सादर केले. तसेच 'जय गणेश' ह्या हिंदी बालनाट्याचे सादरीकरण केले. या दोनही (नृत्य/नाटक) कार्यक्रमांना द्वितीय क्रमांकाचे बक्षिस मिळाले, तर आमचा बाल गणेश साकारणारा स्वराज बेंद्रे हा उत्कृष्ट नट ठरला.

गेली तीन वर्षे सातत्याने आमचे बालकलाकार या स्पर्धेत बक्षिसं मिळवत आहेत.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**क्रांतीज्योत सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महाजागर**

जागरजाणिवांचा अभियान, राष्ट्रीय सेवा योजना,. ग्रंथालय विभाग, राष्ट्रीय छात्र सेना व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्तरित्या केलेल्या आयोजनात ३ जानेवारी २०१६ रोजी प्रथम स्त्री शिक्षिका, क्रांतीज्योत सावित्रीबाई यांची जयंती मोठ्या दिमाखात साजरी करण्यात आली.

ग्रंथालय विभागात याच प्रयोजनार्थ एका आगळ्या वेगळ्या ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन केले होते. यामध्ये महात्मा फुले समग्र ग्रंथ, सावित्रीबाई फुले यांचे चरित्र, लेखन व त्यांच्या जीवनावरील छायाचित्रांचेही प्रदर्शन भरविले होते. ग्रंथालयात येणाऱ्या विद्यार्थांना पाहता येईल अशा दर्शनी भागात हे प्रदर्शन व सावित्रीबाईंचा जीवनपट मांडला होता.

आजची आधुनिक पिढी आपले मूळ विसरत चालली आहे.त्यांना ही जाणीव होईल व वैचारिक प्रगल्भतेबरोबरच ऐतिहासिक प्रबोधनही साधले जाईल याचा जाणीवपूर्वक विचार करून आजच्या तरुणाईसमोर काही चांगले आदर्श व जीवनपट ठेवायला हवेत जेणेकरून त्यांच्या नेणीवाही विस्तारतील, असे मत या कार्यक्रमाच्या मार्गदर्शक व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी मांडले.

**'बांदोडकर कट्ट्यावर रंगली विद्यार्थीशिक्षकांची मैफल'**

आकाशवाणीवरील रेडिओ जॉकी जीतूराज यांनी अनावरण केलेल्या व विशेष उल्लेख करून गौरविलेल्या बांदोडकर कट्ट्यावरील चौथ्या मैफिलीचे आयोजन महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातर्फे करण्यात आले.

यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या काव्य रचना, पार्श्वगायन, वाद्यसंगीत व लोकसंगीत इत्यादी कार्यक्रम सादर केले. या मैफिलीत विद्यार्थ्यांचा सांगीतिक कलाविष्कार श्रवणीय होता. अकरावी पासून पदवी महाविद्यालयातील विविध वर्गातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे आपल्या रचना सादर केल्या व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

'बांदोडकर कट्टा' हा विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना आकार देणारा एक सांस्कृतिक मंच आहे व विज्ञानाच्या अध्ययनाबरोबर विद्यार्थ्यांची सांस्कृतिक कलाविष्कारातील अभिरुची वाढविण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाने उचललेले पुढचे पाऊल आहे असे प्रतिपादन महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे समन्वयक प्रा. प्रकाश माळी यांनी केले.

'Open Theatre' च्या संकल्पनेवर आधारित असलेला **''बांदोडकर कट्टा''** हा सर्व विद्यार्थ्यांना कलाविष्कार व सर्जनशील विचारांना वाव देणारा 'खुलामंच' ठरू पाहात आहे.' असे गौरवोद्गार महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. र. प्र. आठल्ये यांनी यावेळी काढले.

### 'नेहरू विज्ञानकेंद्र' आयोजित 'विज्ञान प्रश्नमंजुषा' ('Science Quiz')

नेहरू विज्ञान केंद्र व सी. एच. एम. महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या विज्ञान प्रश्नमंजुषा म्हणजेच Science Quiz मध्ये महाविद्यालयातील अकरावीतील दोन संघ तृतीय क्रमांक मिळवून यशस्वी झाले. एक हजार रुपये रोख, चषक व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

संपूर्ण ठाणे जिल्ह्यातून अनेक महाविद्यालयांनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला. बांदोडकर महाविद्यालयातून यश मोरे, चिन्मय कारेकर, राहुल खरे व सनी नरवडे अशा चार विद्यार्थ्यांचा चमू या स्पर्धेसाठी पाठविण्यात आला होता.

'बांदोडकर विज्ञान महाविद्यालय हे मुंबई विद्यापीठातील एकमेव फक्त विज्ञान शाखा असलेले महाविद्यालय असून विज्ञान विषयक सर्वच उपक्रमांत आपले स्थान राखून आहे. व त्याकरिता विद्या प्रसारक मंडळ सर्वपरिने प्रयत्नशील असते' असे मत व्यक्त करून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.माधुरी पेजावर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

### ''फ्रेंड्स ऑफ लायब्ररी'' व ''माझे ग्रंथालय'' यांचा संयुक्त ग्रंथपेटी आदान प्रदान सोहळा

फ्रेंड्स ऑफ लायब्ररी क्लब आणि ठाणे विभागाच्या माझे ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ग्रंथपेटी आदानप्रदान कार्यक्रमांतर्गत गुरू शंकराचार्य यांच्या संस्कृत स्तोत्रांवर आधारित एका छोटेखानी परंतु सकस व दर्जेदार कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि.१९ डिसेंबर रोजी करण्यात आले होते. सौ. उज्ज्वला टिळक, सौ. सुनिता शेजवलकर व सौ. अश्विनी वावीकर या व्यवसायाने अनुक्रमे लिपिक, शासकीय विपणन व गृहिणी असणाऱ्या अभ्यासकांनी आपल्या पाठांतर कलेच्या जोरावर जगतगुरू शंकराचार्य यांच्या निवडक स्तोत्रांवर आधारित एक बहारदार नजराणा रसिक श्रोत्यांसमोर ठेवला व सर्वांना मंत्रमुग्ध केले. मंत्राचे पठण, उच्चारण त्यातील शक्ती व प्रबोधन यांचा अनोखा संगम रसिकांना अनुभवायला मिळाला.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी तिन्ही पाहुण्यांचे पुस्तक भेट देऊन स्वागत केले. व दिवसेंदिवस वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. त्यामुळे पुष्प किंवा पुष्पगुच्छाऐवजी आपण सर्वांचेच स्वागत ग्रंथ भेट देऊन केले तर वाचन संस्कृती जोपासण्यासारखेच आहे हे स्पष्ट केले. तसेच वाचक जर पुस्तकांपर्यंत पोहोचत नसतील तर पुस्तकांना वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे काम फ्रेंड्स ऑफ लायब्ररी क्लब व माझे ग्रंथालय, ग्रंथपेटी योजना, ग्रंथ तुमच्या दारी, Books on wheels यांसारख्या संस्था अविरतपणे करत असतात.

स्वतःवर असलेला विश्वास जेव्हा अधिकाधिक घट्ट होतो, तेव्हा तोच विश्वास आपल्या आयुष्यातही परावर्तित होतो.

महाविद्यालयाच्या ग्रंथपाल यांनी या कार्यक्रमाची भूमिका व प्रयोजन स्पष्ट करताना सांगितले की, नुकताच डॉ. ए. पी. जे.अब्दुल कलामांचा जन्मदिवस आपण 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला. परंतु तेवढ्यावरच सिमीत न राहता रसिकांना अभ्यासनीय ग्रंथ, पुस्तके यांचा आदर्श समोर ठेवला पाहिजे म्हणजे वाचकांच्या जाणीवा विस्तारतील व अशा दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा उद्देश हाच आहे.

दोन तास चाललेल्या या स्तोत्र निरुपणांच्या कार्यक्रमात विविध देवी-देवतांच्या पुराण कथा व महाराष्ट्राच्या शक्तीपीठांचा उल्लेख झाला. शंकाराचार्यांच्या स्तोत्रांबरोबरच जोगवा, आरत्या सादर करण्यात आल्या. टिळक, शेजवलकर व वावीकर यांनी त्यांना आपल्या सर्जनशील शैलीमध्ये चाली लावून त्या श्रवणीय करण्याचे कसब दाखवून दिले.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. र. प्र. आठल्ये यांनी आभार मानताना सांगितले की, आताच्या जमान्यात स्त्रियांची विविध क्षेत्रात कर्तृत्व दाखविणारी रुपे दिसतात ती देवीचीच विविध रुपे होत. प्रसंगी मृदु व प्रसंगी कठोर अशी अनेक विलोभनीय रुपे सभोवतालच्या स्त्रियांमध्ये दिसत असतात. त्याचाच प्रत्यय विविध स्तोत्रांमधील वर्णनातूनही आला. शेवटी ग्रंथपेटी आदानप्रदानाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर या दर्जेदार कार्यक्रमाची सांगता झाली.

### रस्ता सुरक्षा सप्ताहांतर्गत मोहीमेतील पथनाट्याला प्रथम क्रमांकाचे पारितोषक

ठाणे वाहतुक पोलीस आयुक्तालयातर्फे आयोजित केलेल्या रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जिल्हास्तरीय पथनाट्य स्पर्धेत महाविद्यालयाला पाच हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळाले आहे. ठाण्याच्या ज्ञानसाधना महाविद्यालयात पार पडलेल्या पथनाट्यस्पर्धेत ठाण्यातील एकूण आठ महाविद्यालयांनी आपला सहभाग नोंदविला.

महाराष्ट्रात प्रतिदिन १०० असे रस्ता अपघातांचे प्रमाण आहे आणि यामध्ये दुचाकी स्वारांचे प्रमाण ८०% असते व त्यातील जीवितहानीचे महत्त्वाचे कारण म्हणजे हेल्मेट न वापरणे हे होय. त्यामुळे युवकांच्या मनात रस्ता सुरक्षेचे महत्त्व व जीवितरक्षा हे बिंबविणे व ०% अपघात हे लक्ष्य गाठणे हे या अभियानाचे उद्दीष्ट आहे असे डॉ. रश्मी करंदीकर यांनी सांगितले.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, जागरजाणिवांचा अभियानांचे समन्वयक्र राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख व सांस्कृतिक विभागाचे समन्वयक या सर्वांनी समन्वयकाची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली व ठाण्यातील सर्वच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या अभियानातील पुढच्या होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेत पारितोषिक म्हणून विजेत्यांना महिंद्रा कंपनीतर्फे स्कूटर व मोटरसायकल देण्यात येणार आहे.

### ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात अभ्यासक्रम शिबिर

महाविद्यालयात चालवल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात या अभ्यासक्रमाचे २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाचे शिबिर दि.१६.१२.२०१५ ते १८.१२.२०१५ या दिवशी पार पडले. दररोज सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

दि.१६ डिसेंबर २०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता या शिबिराचे उद्घाटन शिबिर तज्ज्ञ डॉ. प्रकाश करमरकर, निवृत्त ग्रंथपाल, वझे केळकर महाविद्यालय मुलुंड व सौ. शुभांगी वेदक, ग्रंथपाल, रामनिरंजन झुनझुनवाला महाविद्यालय, घाटकोपर यांच्या हस्ते झाले.

या शिबिरासाठी बा. ना. बांदोडकर अभ्यासकेंद्राचे एकूण १९ विद्यार्थी पूर्णवेळ उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांचे प्रकल्प-आराखडे मंजूर झाले.

---

आनंदात असताना हे माझ्याच बाबतीत का? असा प्रश्न आपण विचारतो का? मग दुःखात असतानाही हा प्रश्न विचारण्याचा आपल्याला काहीही हक्क नाही.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१. मुंबई विद्यापीठाच्या प्रथम, तृतीय व पाचव्या सत्राची परीक्षा दिनांक १८ नोव्हेंबर २०१५ पासून विधी महाविद्यालयात सुरू झाली.

२. मुंबई विद्यापीठाच्या प्रथम, तृतीय व पाचव्या सत्राच्या परीक्षांचे उत्तरपत्रिका तपासणी महाविद्यालयात सुरू झाली. यामध्ये सर्व शिक्षक तपासणीचे काम करत आहेत.

३. विधी महाविद्यालयामध्ये दि. २६ नोव्हेंबर २०१५ रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांच्या हस्ते संविधानाच्या प्रास्तविकेचे छायाचित्राचे आवरण करण्यात आले. तसेच महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये ॲड. पायक यांनी संविधानावर थोडक्यात माहिती देत प्रास्ताविकेचे वाचन केले. शेवटी सर्वांना चहा देऊन सदर कार्यक्रम संपविण्यात आला.

४. संविधान दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयाने संविधानावर विधी परीक्षा आयोजित केली होती. यामध्ये काही विद्यार्थ्यांनी भाग घेऊन परीक्षा दिली.

५. **DLLE -** मुंबई विद्यापीठाचे DLLE या विभागामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या अनेक योजनांमध्ये विधी महाविद्यालयाने पहिल्यांदा सहभाग नोंदविला. यामध्ये प्रा. विनोद वाघ व ॲड. डिसोझा यांना समन्वयक नेमण्यात आले. सदर DLLE मध्ये महाविद्यालयाच्या ६८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सदर विद्यार्थ्यांना नोव्हेंबर महिन्यामध्ये काही विषयांवरील प्रोजेक्ट देण्यात आला होता. तो त्यांनी वेळेत पूर्ण करून दाखल केला.

६. विधी महाविद्यालयाची विद्यार्थी कु राजश्री उत्तमराव इंगळे हिने मुंबई विद्यापीठ आयोजित आंतर महाविद्यालयीन बॉक्सींग स्पर्धेमध्ये कास्यपदक मिळविले. यासाठी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी तिचे कौतुक केले.

**आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवस साक्षरता कार्यक्रम**

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनी विद्या प्रसारक मंडळाचे विधी महाविद्यालयातील प्रथेप्रमाणे ह्या वर्षी देखील कायद्याविषयी लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचा कार्यक्रम करण्यात आला. ह्या वर्षी शिशू विकास विद्यालय माध्यमिक विभाग कोपरी ठाणे पूर्व येथे कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.

इयत्ता ८, ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यासाठी सदर कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. भारतीय संविधानाने दिलेले अधिकार शिक्षणाचा हक्क बालकामगार पर्यावरणाविषयी जागरुकता तसेच बालकांचे लैगिक शोषण ह्यासारखे नाजूक विषय देखील हातळण्यात आले.

विद्यार्थ्यांद्वारे चित्रफीती विडीओ तसेच पथनाट्याद्वारे सदर विषयांचे उत्तमरित्या सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रम हा वाद-संवाद पद्धतीने घेण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना त्यात सहभागी करण्यासाठी उत्तेजन देण्यात आले.

हा वार्षिक कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार, प्राध्यापक विनोद वाघ व शाळेच्या प्राचार्या श्रीमती इंगळे ह्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. तासभर चाललेले हे शैक्षणिक सत्र भावी वकील रितेश सावंत, हेमाली पाटील, अंकिता पवार, सोनम सिंग व नरेंद्रकुमार पराशर ह्यांनी उत्तमरित्या पार पाडले.

**लैंगिक हिंसा प्रतिबंध या विषयावरील कार्यशाळा**

दिनांक १४ व १५ डिसेंबर २०१५ रोजी भिंवडी

येथील मोमीन महिला महाविद्यालय व मुंबई विद्यापीठ यांनी दोन दिवसीय लैंगिक हिंसा प्रतिबंध या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार व ग्रंथपाल कु. शितल औताडे यांनी सहभाग घेतला.

**कुलगुरू सोबतची प्राचार्यांची बैठक**

मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू व BCUD चे प्रबंधक यांनी CBT महाविद्यालय पनवेल येथे प्राचार्यांची बैठक दिनांक १५ डिसेंबर २०१५ रोजी बोलाविली होती. सदर बैठकीचा उद्देश विद्यापीठाने विविध विषयांवर केलेल्या कामाचा आढावा घेणे होता. शिवाय शासनाच्या विविध शैक्षणिक योजनाही यावेळी चर्चा करण्यात आल्या. तसेच नवीन महाविद्यालय व नवीन विषयासाठी अर्ज करण्याची ही माहिती देण्यात आली.

**PPP स्पर्धा**

बिर्ला महाविद्यालय कल्याण यांनी Power Point Presentation on ''स्त्रियांचे अधिकार'' ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कु. अंकिता पवार व कु.सोनम सिंग यांनी भाग घेऊन पहिले पारितोषिक मिळविले.

**तृतीय विधी प्रात्यक्षिक वर्ग**

महाविद्यालयाने दिनांक ७ ते २२ डिसेंबर २०१५ या दरम्यान तृतीय विधी या विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक विषयाचे विशेष व्याख्यान घेण्यात आले. यावेळी मसुदा जसे रिट फौजदारी मसुदे, दिवाणी मसुदे, कौटुंबिक तसेच विविध प्रकारचे करार व इतर कायदेशीर कागदपत्रांची माहिती देण्यात आली. सामान्यपणे एल.सी.डी. आणि ओ.एच.पी.चा वापर करण्यात आला. प्रत्येक सत्रात विद्यार्थ्यांना त्यांचे शंका निरसन करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

**विधी फाऊंडेशन प्रभाकर हेडगे व्याख्यानमाला**

विधी फाऊंडेशन ठाणे व विद्या प्रसारक मंडळाचे विधी महाविद्यालय यांनी दिनांक १३ डिसेंबर २०१५ रोजी प्रभाकर हेगडे व्याख्यानमाला आयोजित केली होती. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायाधीश धनुका यांनी "Arbitration & Conciliation" या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच ॲड. प्रशांत माळी यांनी "Cyber Crime" या विषयावर व्याख्यान दिले. ठाणे टाऊन हॉल येथे हा कार्यक्रम पार पडला, यावेळी महाविद्यालयाचे २०१४-२०१५ या वर्षाचे विद्यार्थी गौतम जैन यांना "Best Young Student Law Practice Aspirant Award" देण्यात आले.

**CAS प्रमोशन**

दिनांक १२ डिसेंबर २०१५ रोजी Scrutiny and Evaluation या समितीची महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांना सहाय्यक प्राध्यापक Stage to 2 State 3 CAS प्रमोशनसाठी बैठक घेण्यात आली. समितीने प्रमोशनसाठी शिफारस केली.

**माहितीचा अधिकार विशेष वर्ग**

दिनांक २२ डिसेंबर २०१५ रोजी पुणे येथील ''यशदा'' या संस्थेच्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या विषयावर विशेष वर्ग घेण्यात आला होता. श्रीयुत अशोक पवार, सावंत व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी यावेळेस अतिशय मौलीक मार्गदर्शन व माहिती दिली.

विद्या प्रसारक मंडळाचे, ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे प्रथम विधीचा विद्यार्थी कु. स्वानंद गांगल आणि कु. अक्षय अवसरे यांनी औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयाने आयोजित केलेली कै. विनायकरावजी पाटील स्मृती समारोहमध्ये कथाकथन व वक्तृत्व स्पर्धा यामध्ये भाग घेतला.

मनातला कोणताही विचार कागदावर सहज येत नाही. तो आधी जगण्यात असावा लागतो.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### रक्तदान शिबिर

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनच्या ISTE स्टुडन्ट चॅप्टरच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन शुक्रवार दि. ११ डिसेंबर २०१५ या दिवशी केले होते. प्लाझमा ब्लड बँक आणि HDFC बँकेच्या सहयोगाने हे शिबिर भरविण्यात आले होते.

शिबिरामध्ये अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करून आपला उदात्त हेतू साध्य करून घेतला. त्यामध्ये प्राध्यापकांपासून ते विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होते.

सदर शिबिर हे सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेत तंत्रनिकेतनच्या प्रवेशद्वाराजवळील वर्गखोल्यात पार पडले.

### सहवेदना



विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या कार्यालयातील प्रमुख लिपिक **सौ. प्रतिमा राजेंद्र मदन** यांचे दिनांक २० डिसेंबर २०१५ रोजी कर्करोगाच्या आजाराने निधन झाले. त्या ५० वर्षांच्या होत्या.

१९८४ पासून सौ. मदन ह्या तंत्रनिकेतनात कार्यरत होत्या. सध्या त्या प्रमुख लिपिक या पदावर काम करीत होत्या.

अत्यंत मनमिळावू स्वभाव, कामामध्ये वक्तशीरपणा आणि ज्योतिषशास्त्राबद्दलचं ज्ञान ही त्यांची ठळक वैशिष्ट्ये होत. त्यांच्या निधनाने तंत्रनिकेतनमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

तंत्रनिकेतनातील सर्वांतर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो !

### सौ. अंजली अरुण चाफेकर सेवानिवृत्त

वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे या अग्रगण्य संस्थेतून सौ. अंजली अरुण चाफेकर या आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर दि. ३१ डिसेंबर २०१५ रोजी सेवानिवृत्त झाल्या.

सौ. चाफेकर ह्या तंत्रनिकेतनमध्ये २७ ऑगस्ट १९८४ पासून लिपिक म्हणून रुजू झाल्या होत्या. 'प्रिन्सिपल सेक्रेटरी' या पदावरून त्या सेवानिवृत्त झाल्या. तंत्रनिकेतनात त्यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका म्हणजे परीक्षा विभागातील त्यांचं शिस्तबद्ध कार्य. या अत्यंत संवेदनशील अशा परीक्षा विभागाचं कार्य त्या अत्यंत जबाबदारीने पार पाडीत होत्या.

अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाच्या तंत्रनिकेतन युनिटतर्फे युनियनचे ज्येष्ठ सदस्य साहेबराव बोरसे यांचे शुभहस्ते भेटवस्तू, शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार करण्यात आला. ह्या निरोप समारंभ सोहळ्यास तंत्रनिकेतनमधील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सौ. चाफेकर ह्या युनियनच्या सदस्य होत्या.

प्रसन्न आणि मनमिळाऊ स्वभाव ही त्यांची ठळक वैशिष्ट्ये होत. तंत्रनिकेतनातील त्यांचं कार्य त्या अत्यंत चोखपणे पार पाडीत होत्या. सदर निरोप-समारंभ कार्यक्रम प्रसंगी चंद्रकांत शिंगाडे यांनी त्यांच्या विषयीचे मनोगत व्यक्त केले. भावी आयुष्य त्यांना आरोग्यपूर्ण व भरभराटीचे जावो ही सदिच्छा!

कार्यक्रमाच्या शेवटी महाराष्ट्र कवी मंगेश पाडगावकर, विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ सदस्य एस. व्ही. करंदीकर व तंत्रनिकेतनाचे प्रमुख लिपिक प्रतिमा मदन यांचे निधनाबद्दल दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली अर्पित केली.

आणि शेवटी कार्यक्रमाची सांगता झाली.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

### प्रशांत टिळक नंदी याला सुवर्ण पदक




आमच्या महाविद्यालयातील MMS या अभ्यासक्रमाचा विद्यार्थी प्रशांत टिळक नंदी याने राष्ट्रीय Kick Boxing स्पर्धेत सहभागी होऊन सुवर्ण पदक पटकावले. २३ वर्षीय प्रशांत टिळक नंदी याने Kick Boxing Federation of India तर्फे दिनांक ३० डिसेंबर २०१५ रोजी; Talkatora Stedium, नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय Kick Boxing स्पर्धेत खुल्या गटात ७०-७५ (Full Contact) या प्रवर्गात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. स्पर्धेतील अंतिम लढतीत त्याने पश्चिम बंगालच्या खेळाडूशी रंगतदार खेळी करून उल्लेखनीय विजय मिळवला.

प्रशांतच्या यशाचे कौतुक करण्यासाठी डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेतर्फे आयोजित केलेल्या समारंभात संस्थेचे संचालक डॉ. नितीन जोशी यांनी प्रशांतचे अभिनंदन करून त्याला पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रशांतने देखील स्पर्धेतील आपल्या विजयी लढतीच्या स्मृतींचे कथन करून आपल्या विद्यार्थी मित्रांचे आणि संस्थेचे आभार मानले. संस्थेचे विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी कार्यक्रमाला हजेरी लावून प्रशांतला जल्लोषात शुभेच्छा दिल्या.

## पर्यावरण दिन - विशेष

| | |
|---|---|
| १. १४ ते ३० जानेवारी | - प्राणी कल्याण पंधरवडा |
| २. २ फेब्रुवारी | - जागतिक ओलित जमीन दिन |
| ३. २१ मार्च | - जागतिक वनीकरण दिन |
| ४. ७ एप्रिल | - जागतिक आरोग्य दिन |
| ५. १८ एप्रिल | - जागतिक वारसा दिन |
| ६. २२ एप्रिल | - वसुंधरा दिन |
| ७. ५ जून | - जागतिक पर्यावरण दिन |
| ८. १ जुलै | - कृषी दिन |
| ९. ११ जुलै | - जागतिक लोकसंख्या दिन |
| १०. ६ ऑगस्ट | - हिरोशिमा दिन |
| ११. ८ सप्टेंबर | - जागतिक साक्षरता दिन |
| १२. १६ ते १८ सप्टेंबर | - जागतिक स्वच्छता अभियान |
| १३. १६ सप्टेंबर | - जागतिक ओझोन दिन |
| १४. २८ सप्टेंबर | - हरित ग्राहक दिन |
| १५. १ ते ७ ऑक्टोबर | - वन्यजीव सप्ताह |
| १६. ऑक्टोबरचा दुसरा आठवडा | - जागतिक नैसर्गिक आपत्ती - निवारण सप्ताह |
| १७. १६ ऑक्टोबर | - जागतिक अन्न दिन |
| १८. १९ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर | - राष्ट्रीय पर्यावरण जागृती महिमा |
| १९. २४ नोव्हेंबर | - जागतिक जैव विविधता संवर्धन दिन |
| २०. १० डिसेंबर | - मानवी हक्क दिन |

**संकलन**
- चंद्रकांत शिंगाडे
वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय**)

अडथळेच यामुळे निर्माण होतात. हे अडथळे म्हणजे व्यक्त किंवा अव्यक्त, उघड किंवा छुपेपणे विणलेले 'परवान्यां'चे स्तर असतात. या प्रत्येक स्तराकरता एक अधिकारी असतो. इथेच राजकारणी आणि अधिकाऱ्यांची सोय केलेली असते. यातूनच भ्रष्टाचाराचा राक्षस उभा राहतो. यातच जुन्या-नव्या कायद्यांची भर पडते. दलाल किंवा वकिलांच्या मध्यस्ती शिवाय यातली कुठलीच पायरी चढता येत नाही. यातून एखादा उद्योजक बाहेर आलाच तर त्याची ईर्षा संपलेली असते, आणि एका वेगळ्या मानसिकतेतूनच तो व्यापाराकडे बघायला लागतो.

आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यावर येतांना less government and more governance हे त्यांचे धोरण राहील अशी ग्वाही दिली होती. शिवाय 'कालबाह्य' कायदेही टप्प्याटप्प्याने रद्द करण्याचे आश्वासन दिले होते. गेल्या ६८ वर्षांत आपण भारतामध्ये कायद्यांचे जंगल तयार केले आहे. आजही त्यामध्ये नव्याने भर पडतेच आहे. 'कालबाह्य'चा एक अर्थ म्हणजे जुने की जे आता संपूर्णपणे संदर्भहीन आहेत. पण याहीपेक्षा 'कालबाह्य' म्हणजे अगदी अलीकडे केलेले, पण बदलते तंत्रज्ञान आणि जीवनशैली यांच्याशी विसंगत असणारे कायदे. अशा कायद्यांचे जंजाळ आज आपल्याकडे जास्त आहे. वास्तव आणि तर्काशी फारकत घेतलेले हे कायदे फक्त भ्रष्टाचार वाढवतात. नोकरशाही या कायद्याच्या अस्तित्वाच्या समर्थनार्थ भक्कमपणे उभी असते. पूर्वलक्षी करप्रणाली काय किंवा जमीन अधिग्रहण कायदा काय, अगदी अलीकडे केलेले हे कायदे उद्योगधंद्यांच्या विकासाला मारक आहेत हे समजल्यावरही त्यात अपेक्षित बदल होऊ शकत नाही. गाजावाजा झालेली ही फक्त दोन उदाहरणे आहेत. पण उद्योगधंद्याच्या वाटेवर असे अनेक नवीन, जुने कायदे आहेत. या अडथळ्यांचा 'राजकीय' फायदा उमजल्यावर, त्यामध्ये बदल तर सोडाच पण अनेक नवीन वेष्टणेही त्यावर चढवली जातात.

उद्योग आणि अर्थधोरण विश्लेषक मोहनदास पै यांनी या नव-उद्योग धोरणाचे स्वागतच केले आहे. या संदर्भात लिहिलेल्या एक लेखामध्ये या नवउद्योग धंद्यांच्या आजच्या स्वरुपाबद्दल त्यांनी केलेली टिपणी मात्र बोलकी आहे.

Six out of eight Indian Unicorns had re-domiciled outside India. Ten of the top B2B Start-ups had gone, 54 per cent of the top start-ups had gone in 2014 and 75 per cent in 2015. Our policies and tax laws were forcing the best and the brightest to register outside India. Global investors wanted a more benign enviorment with tax certainly as they were investing long-term, not the tax nightmare we have had in India. Our forex regulations were not in tune with investor needs, mergers and acquisitions could become difficult and long-drawn-out and structuring was convoluted.

(Tuesday, 19 January 2016, Business Standard, p.10)

Flipkart या बराच गाजावाजा झालेल्या आघाडीच्या नवउद्योगाची नोंदणी ही सिंगापूरमध्ये झालेली आहे.

अमेरिकेतील Sillicon Valley मध्ये संगणकावर आधारित अनेक नवउद्योग (startups) निर्माण झाले. गुगल, फेसबुक पासून अशा अनेक कंपन्यांची निर्मिती तेथे झाली. या Sillicon Valley मध्ये अनेक भारतीयही कार्यरत आहेत. Sillicon Valley च्या यशाला अमेरिकन सरकारचे कुठलेही विशेष धोरण कारणीभूत नाही. Sillicon Valley च्या यशाला कारणीभूत आहे ती फक्त

‘गुणवत्तेला’ दिलेली मान्यता. शून्य सरकारी हस्तक्षेप, आणि १००% स्वातंत्र्य. भारतामध्येही हे तंत्रज्ञान किंवा त्यावर आधारित उद्योगधंद्यांचा विकास होऊ शकला याचे कारणसुद्धा त्यामध्ये ‘न’ झालेला सरकारी हस्तक्षेप हेच आहे. या नव-उद्योगांमध्ये अपयशही मोठ्या प्रमाणावर असते. पण ते पचवण्याची आणि नाउमेद न होता पुढे पाऊल टाकण्याची ईर्षा महत्त्वाची असते.

कुठल्याही तंत्रज्ञानाच्या विकासाकरता व्यापक, एकमेकांना पूरक अशा वातावरणाची (Ecosystem) गरज असते. ‘शिक्षण’ हा या वातावरणाचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. दुर्दैवानी आज ‘दर्जेदार’ शैक्षणिक निर्मितीलाही सरकारी नियंत्रणांच्या बेड्यांमध्ये जखडून ठेवण्यात आले आहे. ‘स्वातंत्र्य’ आणि ‘स्वायत्तता’ म्हणजे काय याची व्याख्याही सरकारनेच करायची !! ‘राजकीय’ सोयीकरता आरक्षण, नियंत्रण आणि फुकटेपणाची खैरात यामुळे सरकारला हवी असलेली साक्षरांची आकडेवारी कदाचित निर्माण होईल, पण दर्जाचा त्यामध्ये मागमूसही नसेल. नव-उद्योजक निर्मितीकरता सरकारने ‘नव-उद्योग’ म्हणजे काय हे ठरवण्यापेक्षा उद्योग धोरणांमध्ये खरे सुलभीकरण आणणे हे अधिक महत्त्वाचे आहे. पंतप्रधानांनी सादर केलेल्या या कृती आराखड्यामध्ये १९ मुद्दे दिले आहेत. नव-उद्योग म्हणजे काय? आणि त्याची पात्रताही सरकारच ठरवणार आहे!! अडथळ्यांची सुरुवात धोरणांच्या तळटीपांमध्ये आहे. लघू आणि मध्यम दर्जाच्या उद्योगधंद्यांची परिस्थिती ही सध्या चांगली नाही. गेल्या ६८ वर्षांत त्यांच्या विकासाकरताही अनेक योजना जाहीर झाल्या आहेत. प्रश्न आहे तो त्यांच्या अंमलबजावणीचा.

युरोपमध्ये ‘प्रबोधन’ युगामुळे वैज्ञानिक क्रांतीबरोबरच औद्योगिक क्रांतीही जोर धरू लागली. उद्योगधंद्यांना लागणाऱ्या सर्व गरजांची निर्मिती यातूनच व्हायला लागली. वसाहतवादही यातूनच जन्माला आला. या उद्योगधंद्यांच्या विकासामधील सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे तेथील विद्यापीठांचा विकास. विद्यापीठांच्या या विकासामध्ये ‘गुणवत्ते’चा आदर आणि ‘गुणवत्ते’ला प्रोत्साहन, हा एकच घटक महत्त्वाचा होता आणि आजही आहे. यातूनच ‘नावीन्या’चा उदय होत गेला, आणि हेच नावीन्य तंत्रज्ञानाच्या प्रगतीकरता ‘वरदान’ ठरले. अशी दर्जेदार विद्यापीठे हीच तिथल्या उद्योगधंद्यांचा पाया आहेत, सरकारी मदत नाही. दुर्दैवाने भारतामधील परिस्थिती याच्या बरोबर विरुद्ध आहे. राजकारण्यांनी ‘गरिबी’, ‘मागासलेपणा’ आणि ‘जातीयवाद’ यांना अलंकारांचं स्वरूप दिलं आहे. सरंजामशाही मानसिकतेतून आपणच या घटकांचे तारणकर्ते आहोत अशी भूमिका घेत, ‘आरक्षण’ आणि ‘सवलती’ हाच कुठल्याही सरकारी धोरणाचा पाया झाला. शिक्षण धोरणही याला अपवाद नाही. आजच्या नवउद्योग धोरणाचा कृती-आराखडाही याला अपवाद नाही. यामध्ये नावीन्याचा उल्लेख आहे, पण त्याच्या व्याख्येपासून पात्रतेपर्यंतचे सगळे ‘निकष’ हे सरकारच ठरवणार आहे. आजच्या मूठभर नवउद्योजकांच्या यशामध्ये सरकार नसल्याचा फार मोठा वाटा आहे. ‘स्वतंत्र’ आणि ‘स्वायत्त’ शिक्षण हीच या उद्योगधंद्यांची खरी संजीवनी आहे. यामुळे निर्माण होणारे ‘नावीन्य’ हे त्यांचे खरे ‘भांडवल’ आहे. याव्यतिरिक्त जे काही आहे ते सर्व सरकारी ‘गोंगाट’ आहे. मागचा धोरण-गोंधळ वाढवित पुढचा गोंधळ चालू, एवढेच त्याचे स्वरूप आहे.

**- डॉ. विजय बेडेकर**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❉ संपर्क ❉

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.